बिल्वपत्र भक्तिसार

रचयिता : श्रीमती शारदा पागनीस

श्रीजांभेकर महाराज सेवा समिती,
दादर (प.), मुंबई ४०० ०२८.

बिल्वपत्र भक्तिसार पोथी

रचयिता : श्रीमती शारदा पागनीस

प्रकाशक : गंगाबाई आप्पा जगदाळे
श्रीजांभेकर महाराज समाधी मंदिर, परमपूज्य जांभेकर महाराज पथ,
दादर, मुंबई ४०० ०२८. भ्रमणध्वनी : ९७६८२०३०३३

© सर्वाधिकार : श्रीजांभेकर महाराज सेवा समिती.

प्रकाशन क्र. : ७

प्रकाशन : पौष शुद्ध प्रतिपदा, शके १९२०, शनिवार, दि. १९.१२.१९९८

पुनर्मुद्रण : भाद्रपद शुद्ध प्रतिपदा, रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५,
श्रीआप्पा महाराज जगदाळे पुण्यतिथी

मूल्य : ५० रुपये

अक्षररचना : चैतन्य आर्टस, दादर

मुद्रक : प्रचिता प्रिंट प्रा.लि., भायखळा

प्रकाशकीय

परमपूज्य श्रीरामकृष्ण जांभेकर महाराज हे स्वामी समर्थ महाराज यांना श्रद्धास्थानी ठेवणारे थोर संत. श्रीजांभेकर महाराजांनी आपल्या गुरूंच्या आशीवार्दाने आणि स्वतःच्या तपोबळाने गायत्री मंत्राच्या साहाय्याने अनेकांची दुःखे, संकटे दूर केली. निरंतर तपस्या साधनांत मग्न असणाऱ्या या थोर संतांचे देहावसान पौष शु. १, शके १८८२, दि.१० जानेवारी १९४० रोजी झाले.

परमपूज्य श्रीरामकृष्ण जांभेकर महाराज यांच्यानंतर त्यांचे शिष्य श्रीनामेदव महाराज केळकर यांनी आपल्या गुरूंची सेवा अत्यंत श्रद्धेने आणि नेमाने केल्याने या सिद्धहस्त संतांच्या आशीर्वादाचा प्रत्यय भक्तगणांना आजही येत आहे.

श्रीनामदेव महाराज यांच्या शिष्या माउली काशीबाई चव्हाण आणि माउलींचे मानसपुत्र पूज्य आप्पा महाराज जगदाळे यांनी या समाधीस्थानाची अत्यंत खडतरपणे वर्षोनुवर्षे सेवा केली. या चारही परमपूज्य संतांचे समाधिस्थान असलेली पुण्यपावन भूमी म्हणजे दादर चौपाटीजवळील पूज्य श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर यांचे समाधिमंदिर होय.

सदर बिल्वपत्र भक्तिसार रचयिता शारदा पागनीस यांनी ही पोथी अत्यंत प्रासादिक आणि रसमयीरीत्या रचली आहे. त्यांच्यावर अनेक संतांचा वरदहस्त होता, त्याचमुळे बिल्वपत्र म्हणजे बेलपत्राला तीन पाने असतात त्याचप्रमाणे त्यांनी या पोथीत परमपूज्य श्रीरामकृष्ण जांभेकर महाराज, श्रीनामदेव महाराज केळकर आणि माउली काशीबाई चव्हाण यांच्या जीवनलीलांवर आधारित तीन संतांचे चरित्रलेखन काव्यरूपात लिहिले आहे. या समाधिमंदिरात ही पोथी अत्यंत श्रद्धेने वाचली जात आहे.

बिल्वपत्र भक्तिसार या पोथीची यापूर्वीची आवृत्ती संपल्यामुळे पोथीचे पुनर्मुद्रण करताना आम्हाला आनंद होत आहे.

या पोथीचे वाचन करणाऱ्या भक्तांचे दुःख, संकटे, अडचणी, समस्या यांचे निवारण होवो अशी समाधिस्थानातील संतांकडे आणि परमपूज्य श्रीस्वामी समर्थ महाराजांकडे प्रार्थना करीत आहोत. । शुभंभवतु । ■ ■ ■

दि. ६ जून २०२५, वटसावित्री.

बिल्वपत्र भक्तिसाराची पूर्वपीठिका

माझ्या माहेरी धार्मिक रुढी, परंपरा आदी गतानुगतिक आचारविचार पाळले जात नसत. आमच्या घरी शास्त्रीय विषयांवर भरपूर चर्चा चाले. सूर्य, चंद्र, तारे, ग्रहगोल, ब्रह्मांड ह्यांच्या मागे एक अतर्क्य व अगम्य शक्ती आहे. आत्मा, परमात्मा वगैरे मनुष्यनिर्मित कल्पना आहेत असं म्हटलं जाई. माणूस मेला की तो आणि लाकडाचा ओंडका ह्यांत काही फरक नाही, घड्याळाची चावी संपली की ते बंद पडतं, त्याप्रमाणे हृदयक्रिया बंद पडली की शरीर थंडावतं असं माझे वडील म्हणत असत.

उलटपक्षी माझ्या सासरी आमची कुलदेवता-श्रीमंगेशमहालक्ष्मी - हिची रोज यथासांग पूजाअर्चा होते. सर्व कुळधर्म कुळाचार पाळले जातात. परंतु सासर ग्वाल्हेरला व माझा संसार मुंबईत, त्यामुळे त्याही दृष्ट्या मी अनभिज्ञ. तथापि पूर्वसंचित थोर असावं.

सुमारे १९६१-६२ साली एकदा एका मैत्रिणीच्या ओळखीच्या एका गृहस्थांबरोबर शनिवार पेठेतील श्रीरामानंद बीडकर महाराज समाधिमंदिरात गेले. श्रीमहाराजांच्या पूर्णाकृती छायाचित्रासमोर उभे राहून जोशी मला म्हणाले, ''नमस्कार करा आणि तुमची इच्छा पूर्ण झाल्यास श्रीमहाराजांच्या मठाला काहीतरी देईन असा नवस बोला. काय द्यायचं ते

मात्र तुमचं तुम्ही ठरवा'', त्यांनी सांगितले म्हणून केवळ मी नवस बोलले. श्रद्धाबुद्धी वगैरेचा भाग नव्हता. उलट त्या वेळी मनात एक विचार आला. बहुधा ह्या रकमेत जोशींना कमिशन मिळत असेल.

त्यानंतर जोशींच्या सांगण्यावरून श्रीमहाराजांचं जीवनचरित्र विकत घेतलं. लहानपणापासून मला वाचनाचं वेड होतं कदाचित हेही कारण असेल.

घरी गेल्यावर चरित्र उघडलं आणि पुस्तकांतील श्रीमहाराजांच्या छायाचित्राकडे पाहिले. क्षणार्धात माझे विचार पूर्णपणे थांबले. बाह्य जगाचं जणूं भान हरपलं. मात्र हळूहळू टी.व्ही. वर चित्र दिसावीत त्याप्रमाणे मला माझ्या समस्यांचे उत्तर श्रीमहाराजांच्या छायाचित्रात दिसू लागलं. नंतर मी पूर्णपणे भानावर आले. त्या दिवसांनंतर माझ्यावर एखादे संकट आले अगर कोणताही प्रश्न उपस्थित झाला की मी श्रींचं पुस्तक उघडून बसत असे व मला माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळे.

त्या वेळी मला वाटलं की श्रीमहाराजांच्या डोळ्यात हिप्नोटिझम करण्याची शक्ती असावी. कांही माणसाच्या डोळ्यात अशी शक्ती असते असं ऐकलं होते. तसाच काहीसा हा प्रकार असावा असं मला वाटलं. त्यानंतर मी अनेकदा मठांत गेले तरी ह्या विषयावर कोणाशी बोलले नाही कारण माझ्यासारखाच अनुभव सर्वांनाच येत असावा असं मला वाटलं.

पण सुमारे १२ वर्षांनंतर एकाएकी एकदा वाटलं की मला मनुष्यरूपाने एखादा गुरू भेटला पाहिजे. मनाला एक प्रकारे तळमळ वाटू लागली. अनेक लोकांना मी माझ्या मनःस्थितीबद्दल सांगितले. प्रत्येकाने स्वतःच्या गुरूची व माझी भेट घडवून आणण्याचं आश्वासन द्यावं पण प्रत्यक्षात तसं घडू नये असे अनेक प्रसंग आले. शेवटी १९७५ च्या डिसेंबरमध्ये बरेच दिवस डावा डोळा लवत राहिला. इतकं काय चांगलं होणार आहे असं मी मलाच विचारू लागले आणि अकस्मात् ऊर्मी आली व पुण्याला गेले.

पुण्याला 'श्रीज्ञानेश्वर मंदिर' येथे श्रीमामा देशपांडे ह्या सद्गुरूंची कृपा झाली. मी पूर्णपणे बदलून गेले. साधना सुरू झाली. साधना करताना बाह्यजगाचं ज्ञान पूर्णपणे हरपून जाऊं लागलं.

एकदा पुनः भानावर येत असताना श्रीबीडकर महाराजांची आज्ञा झाली की ''माझ चरित्र ओवीबद्ध कर''.

मी लिहित गेले - अखंड लेखन झालं. चरित्र पूर्ण झालं व प्रसिद्ध झालं.

श्रीरामकृष्ण जांभेकर महाराजांचे एक भक्त श्री. बेलसरे ह्यांच्या वाचनात श्रीबीडकर महाराजांचे ओवीबद्ध चरित्र आले. त्यांनी श्रीजांभेकर महाराजांचं चरित्र ओवीबद्ध करता येईल का असं विचारलं आणि श्रीरामकृष्ण महाराज, त्यांचे शिष्य श्रीनामदेव महाराज व शिष्या श्रीकाशीबाई माउली ह्यांची चरित्रे वाचावयास दिली. चरित्रे वाचता वाचता जणूं काही तीनही संत हृदयी प्रकट झाले व ओव्या सुचू लागल्या. संतरूपी दलांनी फुलविलेलं एक ओवीबद्ध 'बिल्वपत्र भक्तिसार' लिहिलं गेलं, मी लिहिलं असं मी म्हणू शकत नाही कारण तें मी लिहीत नाही. सद्गुरू आपली लीला अक्षररूपाने प्रकट करतात ह्याची पुनः एकदा प्रचिती आली. ।। श्री सद्गुरु चरणी समर्पण ।।

- शारदा पागनीस
एफ/४०७, लोकदर्शन,
मिलिटरी रोड, मरोळ, मुंबई ४०० ०५९.

परमपूज्य श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर

भारताच्या महाराष्ट्र राज्याच्या राजधानी मुंबई महानगरीच्या दादर येथील शिवाजी उद्यानाच्या शांत परिसरात आणि रमणीय मनोहारी सागरकिनाऱ्यावर श्रीज्ञानेश्वर मंदिराच्या जवळच स्मशानालगतच्या सुमारे १५,००० चौरस फुटांच्या भूखंडावर इ.स. १९४० पासून अस्तित्वात असणाऱ्या समाधिमंदिराच्या पवित्र वास्तूचे दर्शन आहे!

आज या समाधिमंदिराच्या संकुलात होऊन गेलेल्या चार संतमहात्म्यांची समाधिमंदिर शिल्पे असून त्यांच्या दर्शनाने चित्तवृत्ती चैतन्याने पल्लवित होतात आणि ईशभक्तीच्या चिंतनात प्रपंचग्रस्त भाविक ऐहिक समस्यापूर्ण जीवनातून क्षणभर का होईना मुक्त होतात आणि कैवल्याच्या हर्षभावनांत रममाण होऊन जातात, अशी समाधिमंदिराच्या परिसरातील वास्तवतेची अभिव्यक्ती आणि आविष्कार आहे.

समाधिमंदिराचे आदिपुरुष श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर असून त्यांची जीवनयात्रा अशी होती :

समाधिमंदिराच्या आद्यविभूती प. पू. श्रीरामकृष्ण महाराज यांचा पार्थिव जीवनकाळ सन १८९८ ते १९४०. त्यांचे मूळगाव पोंबुर्ले. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील. त्यांचे वडील अंताजी. अंताजी आणि त्यांचे भाऊ मोरोबा दत्तप्रसाद नाटक कंपनीत काम करीत. ती कंपनी मीरत येथे आली असताना भांडणामुळे कंपनीची पांगापांग झाली आणि कंपनीतील नोकरांवर बेकारी आली. परंतु अंताजी आणि मोरोबा यांना रोजगारधंदा मिळाला आणि त्यामुळे ते मीरत येथे स्थायिक झाले. मोरोबा यांना संस्कृत भाषेचे ज्ञान चांगले असल्याने त्यांचा गावात जम चांगलाच बसला. अंताजी हे रामकृष्णांचे वडील! त्यांची पत्नी द्वारकाबाई ही नारायण बाळकृष्ण बोरवणकर यांची कन्या ! या दांपत्याच्या पोटी सहा मुली आणि चार मुलगे जन्माला आले. रामकृष्णांचा जन्म गिरगावातील गोरेगावकर बिल्डिंगमध्ये त्यांच्या मामाच्या घरी झाला. बाकी भावंडांचा जन्म मीरत येथेच झाला. मामा श्रीराम बोरवणकर आणि त्यांची पत्नी यांना रामकृष्णांचा फार लळा होता. हा आपलाच मुलगा आहे या भावनेने दोघांनी रामकृष्णांचे कौतुक आणि सांभाळ केला. श्रीराम बोरवणकर सेवानिवृत्त झाल्यावर आणि पत्नीचे निधन झालेले असल्यामुळे सुरतजवळ पारडी येथे जमीन विकत घेऊन घर बांधून एकटेच राहावयास आले आणि बहीण, तिचे पती आणि मुले यांनी आपल्याजवळ राहावयास यावे, अशी इच्छा प्रगट केल्यावरून ते सर्वचजण मीरत सोडून पारडी येथे राहावयास आले. पुढे मामांच्या ओळखीने पोस्ट आणि टेलिग्राफ खात्यात शिक्षण विशेष नसल्यामुळे रामकृष्णांना पोस्टमनची नोकरी मिळाली. जबाबदारीने काम करण्याची प्रवृत्ती आणि व्यावहारिक हुशारीने त्यांना बढती मिळत राहिली. थोड्याच दिवसांत सुरतजवळच्या शिंगणपूर येथे ब्रँच पोस्टमास्तरच्या जागी रामकृष्णांची नेमणूक झाली. लहानपणापासून म्हणजे विशेषतः मुंज झाल्यापासून ते गायत्री मंत्राचा सतत जप करीत. जप ही त्यांची अखंड साधनाच झाली. अखंड साधनेमुळे त्यांची आध्यात्मिक योग्यता आणि पात्रता महनीय झाली आणि त्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या व्यक्तींना त्यांनी दिलेले सल्ले आणि उपदेश सुफलदायी होऊ लागले. त्यामुळे गावातील ग्रामस्थांना

त्यांचा मोठा आधार वाटू लागला. निरपेक्ष, निःस्वार्थी आणि सहानुभूतीपूर्ण असा त्यांचा उपदेश लोकांना त्यांच्या ऐहिक संकटांतील मोठा त्राता बनून राहिला होता. गायत्री मंत्रावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सिद्धी प्राप्त करून देणारा, असामान्य दैवी सामर्थ्य देणारा आणि सर्व-कल्याणकारी असा गायत्री मंत्र आहे. अंतिमतः भगवंताच्या चरणांपर्यंत घेऊन जाणारे हे माहात्म्य श्रीरामकृष्ण महाराजांना भगवंतकृपेने लहानपणापासून समजलेले होते आणि अखेरच्या क्षणापर्यंत गायत्री मंत्राचा ध्यास त्यांनी मोठ्या श्रद्धेने जपला. त्यांच्या संपर्कात येणारा माणूस सांगितल्याप्रमाणे वागणारा आहे, असे त्यांना वाटले तरच ते गायत्री मंत्राची दीक्षा देत असत. हे सर्व घडत असताना आणि लोकांच्या उपयोगी पडण्याचे कार्य चालू असतानाच 'मला देव भेटला पाहिजे' या तळमळीने ते अगदी अस्वस्थ होऊन जात असत. ही तळमळ अनावर होऊन ते सुरतच्या स्मशानाजवळ असलेल्या तलावापाशी रात्री एकटेच आले. देवाचे स्मरण केले आणि तलावात उडी टाकणार तोच कुणीतरी त्यांची मान पकडली आणि खड्या आवाजात त्यांना म्हणाले, ''सुखाचा जीव पाण्यात का लोटतोस?'' त्यावर रामकृष्ण म्हणाले, ''देवाच्या भेटीसाठी मी व्याकूळ आहे. मला देव भेटत नाही. कशाला हवाय हा जीव ?'' त्या व्यक्तीने त्यांचा हात पकडला आणि त्यांना म्हणाली, ''तुला देव भेटला पाहिजे ना? मग चल माझ्याबरोबर. दाखवतो तुला देव''. असे म्हणत त्या व्यक्तीने रामकृष्णांना दर्ग्यापाशी आणले. कानात एक मंत्र सांगितला. मस्तकावर हात ठेवला. ती व्यक्ती अंतर्धान पावली. ती व्यक्ती म्हणजे सय्यद बाबा होते. रामकृष्णांचे या घटनेने समाधान झाले आणि आपणास हवे ते मिळाले या जाणिवेने नंतरच्या काळात वावरू लागले. त्यांच्या वाणीला आणि करणीला उत्तरोत्तर अधिकाधिक धार आली आणि जनमानसात रामकृष्णांचे महत्त्व वाढू लागले.

शिंगणपूर येथे पोस्टमास्तरच्या हुद्यावर असताना त्यांच्या जवळच्या नातेवाइकांनी जेव्हा त्यांना विवाहबद्ध होण्याचा आग्रह केला, तेव्हा ते विवाहास तयार झाले आणि आगाशी, जिल्हा ठाणे येथील श्री. पाध्ये यांच्या घराण्यातील एका मुलीशी त्यांचा विवाह झाला. दरम्यान त्यांचे मेहुणे श्री. सीताराम कृष्णा ठाकूर यांनी त्यांना पंजाबमध्ये बोलावले. नोकरीचा राजीनामा देऊन पत्नीसह रामकृष्ण पंजाबात गेले. ही एक ईश्वरी प्रेरणा आहे, अशा दृष्टिकोनातून तिकडे गेल्यावर मेहुण्याच्या ओळखीने पुन्हा पोस्टात नोकरी मिळण्यास वेळ लागला नाही. पंजाबात गेल्यावर पेशावर-लाहोर-अमृतसर येथे त्यांनी वॉशिंग कंपनीचा व्यवसाय केला. नोकरी-व्यवसाय करीत असतानाच त्यांचे लक्ष साधनेकडेही तितकेच आकृष्ट होत होते. पेशावर येथे असताना पहाटेच्या वेळी साधना करीत असताना कुणी अवलिया त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला. त्याने रामकृष्णांना आशीर्वाद दिला आणि सतत जप करण्याचा उपदेश करीत म्हणाला, ''तू संसाराचा मोह सोडून दे. तुला मी संसारातून उठविणार आहे. संसारात मन रमविणे हे कार्य तुझे नव्हे. तुझ्यापुढे फार मोठे कार्य आहे आणि ते तू पार पाडलेच पाहिजे, ही देवाची इच्छा आहे.'' या घटनेस काही दिवस लोटले. पुन्हा तो अवलिया रामकृष्णांसमोर येऊन उभा राहिला आणि म्हणाला, ''अजून तू जागा होत नाहीस. आता तुझे मूल मी मारून टाकणार आहे. तुझ्या बायकोची पण तीच गत होणार आहे. तेव्हा तू नोकरी सोड. फंडाचे मिळणारे पैसे बहिणीला देऊन टाक. पैशाचा, घरादाराचा लोभ सोड. या संसारात गुरफटून राहणे हा तुझा मार्ग नव्हे, हे पुनःपुन्हा मी तुला सांगत आहे.''

अमृतसर येथे असताना एका ओळखीच्या देसाई नामक व्यक्तीच्या आग्रहावरून एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या पत्नीला होणाऱ्या त्रासनिवारणार्थ रामकृष्ण महाराजांनी २१ दिवसांचे हवनव्रत आरंभिले. त्या व्रताच्या विसाव्या दिवशी त्यांनी प्रार्थना करून म्हटले, ''या व्रताला जरूर ते उत्तर मिळाले नाही तर मी या होमकुंडात उडी घेऊन स्वतःचा होम करून घेईन.'' त्यांना त्या वेळी दृष्टांत झाला, ''तू मला विसरलास तरी मी तुला विसरलो नाही. बंद पडलेले कार्य चालू ठेव. मी तुझ्या पाठीशी आहे. माझी कृपादृष्टी तुझ्यावर आहे.'' दुसऱ्या दिवशीच एक अभूतपूर्व घटना घडली. ज्या खोलीत होमकुंड पेटत होते, त्या खोलीचा दरवाजा एकाएकी कोसळून पडला. तो जांभेकर महाराजांच्या अंगावर पडायचा; परंतु ईश्वरी कृपेने ते बचावले. महाराजांना या घटनेचे आश्चर्य वाटले. असा अपशकुन का व्हावा, याचे कोडे पडले असता पुन्हा त्यांना दृष्टांत झाला, ''हे तुझे मरण होते. ते टाळून तुझ्या बायकोवर गेले आहे. जागा हो आणि कार्यास लाग.'' त्याच वेळी त्या व्यापाऱ्याने कोणत्या गोष्टी करायला हव्यात, त्यांचाही त्यांना दृष्टांत झाला. त्याप्रमाणे महाराजांनी सांगितल्यावर व्यापाऱ्याला धनलाभ झाला आणि त्याच्या पत्नीचा त्रासही दूर झाला. २२ बिघे जमीन देण्याच्या वचनास व्यापारी मात्र जागला नाही. त्याने महाराजांना पाचशे रुपये देऊ केले. महाराजांनी ते मुळीच स्वीकारले नाहीत आणि त्या वेळेपासून लोककल्याणार्थ महाराजांनी आपले दैवी कार्य सुरू केले. अवलियाने केलेल्या भाकितानुसार मुलीपाठोपाठ महाराजांची पत्नी त्यांना सोडून देवाघरी गेली. जवळचा पैसाअडका गेला आणि रामकृष्ण एकटे- एकाकी झाले. सततच्या मंत्रजपात त्यांना या सर्व गोष्टींचा विसर पडला. त्यांना उन्मनी अवस्था प्राप्त झाली. या अवस्थेत पंजाब सोडून ते पुन्हा सुरतेत येऊन दाखल झाले.

सुरतेला इतरत्र कुठेही न जाता तेथील स्मशानात महाराजांनी मुक्काम ठोकला. हळूहळू 'स्मशानात कुणीतरी साधुपुरुष आले आहेत आणि ते सांगतात ते खरे होते', ही वार्ता आसपासच्या परिसरात पसरू लागली. त्यानुसार दुःखीजनांना दुःखनिवारणाचे उपाय महाराज सांगू लागले आणि महाराजांच्या कृपाप्रसादाने दुःखीकष्टी माणसांना सुखसमाधानाचे अनुभव येऊ लागले. ईश्वरी कृपेने आपल्या पुण्यसंचयाचा सदुपयोग परदुःख निवारण्यासाठी निरपेक्ष आणि निःस्वार्थी आचरणाने महाराजांनी केला. महाराजांची वृत्ती तर कुणी काही आणले तर स्वतःसाठी न घेता तिथेच सर्वांना वाटून टाकण्याची होती. त्यांना अर्पण केलेले पैसे वा वस्तू यापैकी कशालाही ते स्पर्श करीत नसत. महाराजांची ख्याती सर्वत्र पसरली होती. एकदा कामानिमित्त श्रीयुत कामेरकर आपल्या स्नेह्यासह सुरतेला आले असता महाराजांची कीर्ती त्यांना ऐकावयास मिळाली. तेव्हा श्रीयुत कामेरकर स्वतः स्मशानात येऊन महाराजांना भेटले. तेथील एकंदर मनाला समाधान देणारे दृश्य पाहून श्रीयुत कामेरकर त्यांना म्हणाले, ''महाराज! या स्मशानात तुम्ही उघड्यावर राहता. आपल्या कामासाठी अनेक माणसे येथे येऊन तुम्हाला सतावतात, असे आम्ही ऐकले आहे आणि आता पाहत आहोत. तेव्हा तुम्हाला एक विनंती करावीशी वाटते. करू का?''

''करा ना! काय म्हणायचे आहे तुम्हाला ?'' महाराज म्हणाले.

''आमची विनंती एवढीच, की तुम्ही हे स्मशान सोडावे. सुरतही सोडावे. आम्ही मुंबईहून आलो आहोत. परत मुंबईला जाणार आहोत. कृपा करून

आमच्या सांगाती आपण यावे, एवढीच विनंती आहे.''

महाराज म्हणाले, ''मुंबईला यायला माझ्यापाशी पैसा कुठे आहे ? मी आहे फकीर !''

''तुम्ही पैशांची काळजी करू नका. फक्त आमच्याबरोबर यायला तयार व्हा. मुंबईत तुमच्या राहण्यासवरण्याची सर्व व्यवस्था आम्ही करू. त्याची काळजी तुम्ही करू नका. फक्त आमच्याबरोबर येण्यास तयार व्हा, एवढीच आमची विनंती आहे.'' श्रीयुत कामेरकर आणि त्यांचे स्नेही म्हणाले.

महाराजांनी ती विनंती मान्य केली आणि महाराजांचे मुंबईत आगमन झाले. १९३० च्या सुमारास मुंबईत आल्यावर सुरुवातीला 'भूतबंगला' नावाने ओळखल्या जाणाऱ्या घरात ते राहत. त्या घरात राहावयास कुणीच तयार नसे. कारण तेथे भुतांची वस्ती आहे, असा सर्वांचा समज होता. बंगला कायमचा विकत घ्यावा, या दृष्टीने ख्रिश्चन मालकापाशी केलेले प्रयत्न सफल झाले नाहीत, म्हणून प्रभादेवी येथील एक घर दरमहा पंधरा रुपये भाड्याने पुढे महाराजांचे शिष्य झालेल्या नामदेव केळकर मामांच्या मध्यस्थीने घेतले. घराच्या मालकाला फकीरशेट म्हणत असत. कारण त्याच्या वडिलांना एका फकिराने 'समुद्रातील माशांना भात खायला घाल', असा उपदेश केला होता. त्याप्रमाणे केल्यानंतर त्यास संतान प्राप्त झाले होते. त्याची आठवण म्हणून मुलाचे नाव 'फकीर' ठेवण्यात आले होते. या आगरी जातीच्या कुटुंबाचे मोठ्या प्रेमाने महाराजांनी पालनपोषण केले. कारण फकीरशेटची सांपत्तिक स्थिती चांगली नव्हती. इतकेच काय, मुद्दाम पुढाकार घेऊन त्याच्या 'रतन' नावाच्या मुलीचे लग्न महाराजांनी मोठ्या हौसेने करून दिले होते. कारण महाराज कोणाची जातगोत पाहत नसत त्याचप्रमाणे धर्माचा भेदभाव त्यांच्या ठायी नव्हता. हिंदू सणवार जसे ते पाळत तसेच मुसलमानांचे रमजान, ईदसारखे सणवार आणि रोजेही भक्तिभावाने आणि कडक रीतीने पाळत. फकीरशेटच्या घरात लोकोपकाराच्या कार्यासमवेत नामजप, गायत्री मंत्रजप, व्रतवैकल्ये, मौनव्रत आदी साधना महाराजांची अखंड चालूच होती. फकीरशेटच्या घराला मठाचे स्वरूप अशा रीतीने प्राप्त झाले होते.

महाराजांनी सभोवार पाहिले, तेव्हा त्यांना दुःख, व्याधी, दैन्य, दारिद्र्य यापैकी कोणत्या ना कोणत्या दुःखाने माणूस पिडलेला आहे असेच दिसले. त्याशिवाय कुणी मानसिक आणि शारीरिक व्याधींनी अथवा आर्थिक चिंतेने गांजलेले आपले दुःख महाराज दूर करतील, या अपेक्षेने येत असत. कुणालाही महाराजांनी निराश केले नाही. दुःखनिवारण हेच आपले जीवनकार्य आहे, असे समजून प्रत्येकाचा कल आणि कुवत पाहून महाराज उपाययोजना करीत असत. स्वतःला कितीही त्रास झाला तरी त्यांच्याकडे आलेल्याला दूर लोटत नसत. त्याची सर्व व्यवस्था करीत. आपणाजवळ ठेवून घेत असत. पैशाचा अथवा कोणत्याही ऐहिक सुखाचा लोभ महाराजांनी केला नाही. जे काही त्यांच्याकडे येई, ते गरजवंताला देऊन महाराज मोकळे होत असत. असा त्यांचा शिरस्ता होता. वैशिष्ट्य होते.

महाराजांची शिकवण साधी आणि सहजासहजी आचरण करता येईल अशी होती. नामस्मरण करा. दैवताची मूर्ती आठवा आणि मनोभावे भक्ती करा.

कधीही व कुठेही फुकटे अन्न खाऊ नका. काही ना काही काम करा. अंगातून घाम गाळा, म्हणजे खाल्लेले अन्न अंगी लागेल. श्रमशक्ती हीच खरी लक्ष्मी. हातात काहीच काम नसेल तर एखाद्याची लाकडे फोडून द्या. भांडी घासा. काम करण्यात कमीपणा नाही. आपापले स्वतःचे कर्तव्य, सोपविलेले काम, जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रामाणिकपणे झटा, म्हणजे जीवन तुम्ही सार्थकी लावाल. डोळे उघडे ठेवून जगात वावरा, म्हणजे सभोवतालच्या जगात शिकण्यासारखे, गिरविण्यासारखे, आत्मसात करण्यासारखे पुष्कळ काही सापडेल. दानत, इमान, जबान यांचे पावित्र्य राखा. त्यासाठी प्रयत्न करा. सट्टा, जुगार, मद्यपान यांसारख्या व्यसनांपासून दूर राहा. व्यसन लागणार नाही, यासाठी डोळ्यात तेल घालून जपा. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' असे वागू नका. कर्ज काढू नका. कर्ज म्हणजे जिवंतपणीचा नरक आहे. यथाशक्ति परोपकार करा. देवदेवतांची सत्कृत्ये आठवा. त्यांचे स्मरण करून त्यांना शरण जा. ही शरणागती तुमचे जीवन उजळून टाकील... अशा प्रकारचा उपदेश महाराज भक्तांना परोपरीने करीत असत.

ही त्यांची शिकवण म्हणजे श्रीक्षेत्र अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज आणि शिरडीचे साईबाबा यांच्यावरील निस्सीम आणि नितांत श्रद्धेचे दिव्य द्योतक आणि प्रसन्न प्रतीकच आहे. श्रीजांभेकर महाराज प्रत्येक बाबतीत स्वामी समर्थांचा सल्ला घेत असत. अक्कलकोटच्या स्वामी समर्थांना 'आजोबा' आणि शिरडीच्या साईबाबांना ते 'पिता' म्हणत. महाराजांकडे दुःख, संकट घेऊन कुणी आले, की आश्वासनपूर्वक सांगायचे की, ''तुझे गाऱ्हाणे मी आजोबांपुढे ठेवतो. मग काय ते सांगतो. तू मला पुन्हा अमुक दिवशी भेट.'' कुणी काही भक्ताने आणले तर महाराज स्वीकार न करता 'आजोबांना' समर्पण करीत! मठात स्वामी समर्थांची तसबीर पूजेला लावलेली असे. तिची पूजा, आरती नित्यनेमाने होत असे. मठात साजऱ्या होणाऱ्या उत्सवांत स्वामी समर्थांच्या उत्सवाला फार महत्त्व असे. एखाद्या भक्तावर महाराजांची मर्जी बसली, की महाराज त्याला स्वामींची तसबीर पूजाअर्चा करण्यासाठी मोठ्या प्रेमाने देत असत. कधी मनात आले, की काही भक्तांना आपल्याबरोबर घेऊन स्वामी समर्थांच्या समाधीदर्शनार्थ महाराज श्रीक्षेत्र अक्कलकोटला जात असत. ते त्यांचे आनंदाचे आणि समाधानाचे स्फूर्तिस्थान होते.

'सर्वधर्मी समानत्व' हे महाराजांचे वैशिष्ट्य होते. आपलाच धर्म श्रेष्ठ असे ते मानीत नसत. आयुष्यातील दिशादर्शक पहिला साक्षात्कार झाला तो सय्यद बाबा या मुसलमान संताकडूनच! त्यांच्या भक्तसमुदायात हिंदुधर्मीय अधिकांशाने असले तरी कुणी मुसलमान-ख्रिस्ती संकटात सापडलेला आला असताना संकटातून त्याला मुक्त करण्यासाठी अत्यंत प्रेमळ भावनेने ते झटत असत. जो आपल्याकडे येईल तो कोणत्याही जातीचा, समाजाचा, धर्माचा असो, तो मानवजातीचा आहे, हीच दृष्टी त्यांनी सतत बाळगली. स्वतःचा टेंभा त्यांनी मिरवला नाही आणि जाहिरातबाजीपासून ते नेहमीच दूर राहिले.

श्रीरामकृष्ण जांभेकर महाराजांना अन्नदानाचे फार महत्त्व वाटत असे. अनेक हेतूंनी महाराजांकडे लोक येत असत. त्यांचा कार्यभाग साधला पाहिजे. त्यासाठी त्यांच्याकडूनही अन्नदानाचे पुण्य घडावे, हे बोलून न दाखविता मठात हे कार्य अखंड चालू असे. रोज २००-२५० भक्त मठात भोजनास असत. 'अन्नमय प्राण' या उक्तीनुसार अन्नदान हे मोठे पवित्र कार्य आहे, अशी त्यांची ठाम समजूत होती.

'भूतदया हेचि भांडवल संता' यानुसार रामकृष्ण महाराज हे असे उदार अंतःकरणाचे संत होते, की एखाद्याला औषधपाणी सांगून ते स्वस्थ बसत नसत. मठात घेऊन येण्याचा त्यांचा आग्रह असे. ते म्हणायचे, ''बाबा रे, तू शंकित होऊ नकोस. तुझा रोग तुला सोडून जायला पाहिजे ना ? मग येथेच येऊन राहिले पाहिजे. देवकृपेने तुला येथे काही कमी पडणार नाही. तुझे पथ्यपाणी सांभाळले जाईल. तुझे मनोव्यापार ठाकठीक केले जातील. येथे तुला महिना-दोन महिने राहावे लागले तरी त्याची तू चिंता करू नकोस.'' माणसाला सन्मार्गाला लावण्याची आणि माणसात माणुसकी निर्माण करण्याची एक संस्कारशाळा म्हणजे महाराजांचा मठ होता. मातेच्या ममतेने रोगग्रस्त कष्टींना ते जवळ करीत असत.

ईश्वरावरील अढळ श्रद्धा, निरपेक्ष आणि निःस्वार्थी जीवनशैली आणि अखंड गायत्री स्मरण-उपासना यांतून महाराजांना सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. चमत्काराशिवाय नमस्कार नाही, या उक्तीनुसार चमत्कारांच्या योगाने भक्तगणांचे लक्ष माझ्याकडे खेचून घेणे आणि माझ्या सांगण्यानुसार त्यांनी देवभक्ती आणि व्यसनमुक्त जीवनाकडे वळावे, या उद्देशानेच मी चमत्कार करतो, असे महाराज सांगत असत. महाराज हवाबंद पेटीत स्वतःला कित्येक दिवस कोंडून घेत. काचेच्या बाटलीचा चुरा करून पाण्यात तो मिसळवून प्राशन करीत किंवा मद्यपीजनांनी व्यसनमुक्त व्हावे म्हणून त्यांच्याकडील सर्व मद्य प्राशन करूनसुद्धा शरीरावर त्याचा कोणताच परिणाम न होता उलट तोंडातून सुगंधी अत्तराचा वास पसरवीत. अशा प्रकारचे चमत्कार सिद्धीसामर्थ्याने महाराज करीत असत. तसेच नवरात्र उत्सवात देवीचा वेष करून इतक्या तद्रूपतेने भक्तगणांत वावरत असत, की प्रत्येक भक्ताला साक्षात देवीच उभी आहे, असे वाटून राही.

महाराज एकदा कुठेतरी बाहेर गेले होते. झाडाखाली बसलेला, दुःखाने अन् निराशेने गांजलेला तरुण त्यांच्या दृष्टीस पडला. तो महारोगाने पिडलेला आणि आप्तजनांनी घराबाहेर काढलेला होता. महाराज त्याच्याजवळ गेले. त्याच्या खांद्यावरून प्रेमाने अन् मातेच्या ममतेने आपला आश्वासक हात फिरवीत महाराज म्हणाले, ''येतोस का माझ्याबरोबर ? चल, मी तुला दुःखातून मुक्त करतो.'' महाराजांनी त्याला मठात आणले. त्याचे नाव होते 'रामचंद्र सुर्वे.' त्याची ते स्वतः शुश्रूषा करीत. औषध तयार करून त्याचा लेप त्याच्या सर्वांगाला लावीत. असाध्य रोग महाराजांच्या कृपेने आणि निगेने पूर्ण बरा झाला. घरी जायची त्याला महाराजांनी परवानगी दिली आणि पूर्णपणे पथ्य करण्यास सांगितले. रामचंद्र सुर्वेने दुकान काढले आणि हॉटेलातील तळकट पदार्थांच्या अति सेवनाने तो पुन्हा रोगग्रस्त झाला. मठात पुन्हा परतला आणि महाराजांच्या पश्चात दीड-दोन वर्षांनी त्याने इहलोकीची यात्रा संपविली. एकदा मठात त्याचा निवास असताना कुणाच्यातरी तक्रारीनुसार म्युनिसिपालिटीची माणसे त्याला घेऊन जाण्यासाठी आली. हे महाराजांनी आधीच अंतर्ज्ञानाने ओळखले होते. म्हणून त्यांनी रामचंद्र सुर्वेस सांगितले, ''अरे रामचंद्र ! कपडे कर. वरळीच्या समुद्रावर हवा खाण्यास निघून जा. दोन-अडीच तासांनी परत ये.'' त्याप्रमाणे रामचंद्र मठाबाहेर निघून गेला. मठाचा पूर्ण शोध करूनही महारोगी काही सापडला नाही, म्हणून आलेली म्युनिसिपालिटीची माणसे हात हलवीत परत गेली.

या सर्व घटनांचा कालावधी आहे १९३२ च्या सुमाराचा. महारोगी म्हणजे माणसातून उठलेला प्राणी. त्याला घरात बाळगणे म्हणजे महाभयंकर. ती दयेला,

सहानुभूतीला आणि मायेला पात्र नाही, अशा तऱ्हेची समजूत समाजात दृढमूल होती. या समजुतींना आणि विचारांना हादरा देण्याचे कार्य महात्मा गांधी, श्री. हरिहरराव देशपांडे, बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन यांनी आपल्या प्रदीर्घ प्रयत्नांतून महारोग्यांसाठी वसाहती स्थापन करून, त्यांना उद्योगधंद्यास लावून या हतभागी, दुर्दैवी माणसांना माणसांत, समाजात आणून केले. म्हणजेच महाराजांनी एका महारोग्याची स्वतः सेवा करून त्याला दुःखमुक्त करण्याचे केवढे उदात्त आणि उन्नत कार्य केले, याची सार्थ कल्पना येईल. अशाच प्रकारची सेवा, वागणूक, काळजी मठात येणाऱ्या प्रत्येक व्याधिग्रस्त व्यक्तीला मिळत असे आणि त्याची राहण्याची, औषधपाण्याची सर्व व्यवस्था महाराज स्वतःच्या नजरेखाली करीत असत. त्यांचे व्याधीदुःख निवारण होण्यासाठी म्हणून औषधोपचाराबरोबर महाराज काही धार्मिक विधी, अनुष्ठाने करीत असत. व्रते-उद्यापनाचे कार्य महाराजांनी भक्तगणांच्या रोगनिवारणार्थ केले, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. प्रसंगी दुसऱ्याची व्याधी ते स्वतःवर ओढवून घेत असत.

महाराजांची ही कीर्ती ऐकून एक गुजराथी गृहस्थ मठात आले. अर्धांगाच्या असाध्य रोगाने त्यांचे वडील गांजले होते. त्यांना दुःखमुक्त करण्यासाठी त्यांनी महाराजांची करुणापूर्ण प्रार्थना केली. महाराजांचे अंतःकरण द्रवले. ते त्याला म्हणाले, ''अक्कलकोटच्या स्वामी समर्थांसाठी काही करण्याची तुझी तयारी आहे का ?''

त्यावर ते गृहस्थ म्हणाले, ''महाराज, काय सांगाल ते करण्याची माझी तयारी आहे. वडिलांना दुःखमुक्त करा, हीच माझी विनंती.''

''तुझी विनंती स्वामी समर्थांच्या दरबारी रुजू झाली आहे,'' असे म्हणत महाराज मटकन खालीच बसले.

काय घडले ? महाराजांनी दुःखी गुजराथी गृहस्थाची व्याधी स्वतःवर ओढवून घेतली होती. हा प्रकार पाहून सभोवतालची भक्तमंडळी महाराजांना म्हणाली, ''महाराज, काय केलेत हे ?''

''काही चिंता करू नका. हा देह सोडून दहा महिन्यांनी मला जायचेच आहे. तेव्हा जाता जाता एखाद्याचे दुर्धर दुःख दूर करण्याची संधी मी का साधू नये ?''

अशा प्रकारच्या अनेक घटना, आठवणी भक्तगणांच्या कुटुंबात चिरंतन तरळत आहेत...!!

त्यातील काही प्रसंग-आठवणी-अनुभव प्रेरणादायी आहेतच. त्याव्यतिरिक्त श्रीरामकृष्ण जांभेकर महाराजांच्या ठायी निर्माण झालेल्या अलौकिक दैवी सामर्थ्याच्या आहेत, की ज्या सामर्थ्याचा आणि शक्तीचा (सिद्धी) उपयोग महाराजांनी लोककल्याणार्थ केला. **********

श्रीरामकृष्ण जांभेकर महाराजांचे उत्तराधिकारी - श्रीनामदेव महाराज केळकर

श्रीनामदेव महाराज केळकर यांचा जन्म इ.स. १९०० मध्ये राजापूर तालुक्यातील भडे नामक गावात झाला. मूळचे घराणे गोव्यातील. पण तेथील पोर्तुगीजांच्या जाचाला - छळाला कंटाळून राजापूर तालुक्यात घराण्याचे स्थलांतर झाले. घराण्यातील पहिले ज्ञात पुरुष श्री. बाळाजी केळकर हे सर्वसंगपरित्याग करून संन्यासी झाले होते आणि त्यांनी संजीवन समाधी घेतली होती. श्रीनामदेव महाराजांचे वडील भगवद्भक्तपरायण होते आणि त्यांना

देवधर्म, तीर्थयात्रा यांची विशेष आवड होती. नामदेव महाराजांना पण लहानपणापासून देवाधर्माची ओढ लागली. त्यांच्या मातोश्रीसुद्धा देवभोळ्या आणि परोपकारी वृत्तीच्या होत्या. अगदी लहान असूनसुद्धा ईश्वरभक्तीत रममाण आणि तल्लीन होणाऱ्या नामदेवांचे विशेष कौतुक होत असे.

मराठी तिसरीतच शाळा सोडून वयाच्या १३व्या वर्षीच ते मुंबईला आले. फणसवाडीत टोप्या शिवण्याचे शिक्षण घेऊन त्यात त्यांनी अप्रतिम कौशल्य प्राप्त केले. फणसवाडीतील श्रीव्यंकटेश मंदिराजवळ टोप्यांचा कारखाना सुरू केला. वीसच्या वर कारखान्यात कामगार ठेवून अलौकिक व्यावसायिक यश संपादन केले. देवभक्ती, देवकार्य, ईश्वरनिष्ठा मनात तशीच कायम होती आणि परमार्थाकडे वळायचे निमित्त करून त्यांनी कारखाना विकून टाकला. काकडवाडीत जागा घेऊन ईश्वरी उपासनेत ते जीवन कंठू लागले. हे नामदेवांच्या आईवडिलांच्या कानावर आले आणि नामदेवांच्या काकांनी सर्वांनी मिळून नामदेवांच्या विवाहाचा विचार पक्का केला. कारखाना विकून संन्यासाच्या मार्गाकडे नामदेव वळत आहेत, हे पाहून काकांनी त्यांचे मन वळविले आणि त्यांना गावाला घेऊन आले. नामदेवांची वृत्ती आणि स्वभाव इतका अनासक्त आणि परोपकारी झाला होता, की स्वतःच्या विवाहासाठी आणलेले रु. दोन हजार गावातील भोसले नामक गृहस्थास त्याच्या मुलीचे लग्न व्हावे म्हणून नामदेवांनी देऊन टाकले. त्यामुळे घरात संतापाची लाट उसळली होती तरी नामदेव धीरगंभीर आणि स्वस्थचित्तच राहिले. पुढे नामदेवांचा विवाह झाला; पण मुंबईत राहणाऱ्या पत्नी राधाच्या काकांशी त्यांची मतभिन्नता झाली आणि 'राधा तुमच्याकडे राहावयास येणार नाही' अशी तंबी आणि धमकावणी पत्नीच्या काकांनी नामदेवांना दिली. शांतपणे धीरोदात्त होऊन नामदेव म्हणाले, काही हरकत नाही. तुमची नि तिची इच्छा. निश्चय आणि निर्धार पक्का आणि अचलित होता. वैवाहिक जीवनाकडे ते फिरकले पण नाहीत. जणू देवाच्या इच्छेने प्रपंचाच्या बंधनातून ते कायमचे दूर झाले आणि शाश्वत सुखाचे वाटसरू बनले.

ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्याच्या ध्येयाने ते पूर्ण निश्चयी झाले. प्रवासासाठी हाताशी पैसाअडका नव्हता. पायी चालत चालत ते अक्कलकोट करीत गाणगापूरला आले. श्रीदत्तगुरूंचे चिंतन करीत झालेल्या प्रवासात भोजन-निवासाची व्यवस्था आपोआप होत राहिली हे विशेष! अपार कष्ट, त्रास सहन करीत ते श्रीक्षेत्र गाणगापूरला पोचले. पण सदगुरूंची प्राप्ती काही झाली नाही म्हणून निराश होऊन पुन्हा अक्कलकोटला परतले. तेथील भक्तमेळाव्याशी एकरूप होऊन मोठ्या करुणेने डोळ्यात पाणी आणून सद्गुरूंची प्राप्ती करून द्या, म्हणून स्वामी समर्थांना विनवू लागले. एक दिवस पहाटेच्या वेळी रामप्रहरी दर्शन देत स्वामी समर्थ म्हणाले, ''मुंबई सोडून भटकू नकोस. तुझा सद्गुरू मुंबईतच आहे. इथे न थांबता तडक मुंबईला जा.'' नामदेव मुंबईला बंधूंकडे परतल्यावर बंधू सांगू लागले, ''प्रभादेवी येथे एक सत्पुरुष आले आहेत. तू त्यांच्या दर्शनास येतोस का?'' हे ऐकताच नामदेवांचा आनंद गगनात मावेना. मोठ्या उत्कंठतेने आणि प्रोत्साहित होऊन नामदेव दर्शनास निघाले. तेथील उत्साहाचे पवित्र वातावरण पाहून ते प्रभावित झाले. नामदेवांना पाहताच रामकृष्ण महाराजांनी त्यांच्याकडे चक्क पाठ फिरविली. नामदेव दुःखी झाले. माझी पाठ सोडू नकोस, माझा पाठलाग कर, असाच पाठ फिरविण्याच्या कृतीचा अर्थ लावून नामदेवांनी रामकृष्ण

महाराजांना साष्टांग नमस्कार घातला. महाराजांनी मोठ्या आस्थेने विचारपूस केली.

मठात आल्यावर श्रीरामकृष्ण महाराजांनी नामदेवांकडून श्रीगुरुचरित्राचे सात सप्ताह करवून घेतले. तसेच पितृघट ही अत्यंत कष्टाची साधना करवून घेतली. ही साधना करताना एकदा पहाटेच्या वेळी नामदेवांना कुत्रे चावले. पाय रक्तबंबाळ झाला. पण पूर्ण मौन पाळून पूजाविधी नामदेवांनी पूर्ण केला. इतकेच काय, मठात मुक्कामास ठेवून घेतलेल्या कुटुंबांतील स्त्रियांची विटाळशीपणातील लुगडी महाराजांनी नामदेवांकडून धुवून घेतली होती. नामदेव महाराजांच्या आध्यात्मिक सामर्थ्यामुळे विटाळचांडाळाचा दोष नाहीसा होईल, ही जांभेकर महाराजांची खात्री होती. म्हणूनच साधनाकाळात अशी कामे-सेवा महाराजांनी नामदेवांकडून करवून घेतली. नामदेव निस्सीम गुरुभक्त होते. महाराजांचा शब्द ते वेदतुल्य मानीत. मठातील पडेल ती सेवा आनंदाने पूर्ण करीत. गुरुदरबारात मानाचे स्थान नामदेवांना प्राप्त झाले. प्रत्येक गोष्ट नामदेव महाराजांच्या सल्ल्याने होऊ लागली. गुरुदेवांच्या सहवासात नामदेवांच्या मनाची निर्मळता पराकोटीची झाली आणि त्यांच्या शुद्ध मनात श्रीपरमेश्वर वास करू लागला.

सन १९४०मध्ये श्रीगुरुदेव श्रीरामकृष्ण जांभेकर महाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून नामदेव महाराजांच्या गुरुसेवेची खरी कसोटी लागली. समाधिस्थानाचे संरक्षण करताना ते अतोनात परिश्रम घेत. प्रत्येक प्रसंगाला नामदेव महाराजांनी धीरोदात्तपणे तोंड दिले. स्मशान कमिटीने अनन्वित छळ आणि त्रास दिला. प्रसंगी तुरुंगवास भोगला. माउली काशीबाई चव्हाण आणि भक्तगणांच्या सहकार्याने समाधिमंदिराच्या रक्षणप्रयत्नात किंचितसुद्धा विचलित झाले नाहीत. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या धैर्यवृत्तीने समाधिमंदिराचे रक्षण करून सर्वांनीच नामदेव महाराजांच्या नेतृत्वाखाली श्रीगुरुदेवांची केलेली सेवा विलक्षण जिद्दीची, अटीतटीची व अभूतपूर्व झाली आणि शेवटी सत्याचा जय - एकूण संग्रामात यशसिद्धी प्राप्त झाली. स्मशान कमिटी रद्दबातल होऊन एकूण कारभार महापालिकेकडे आला आणि दि. २२ एप्रिल १९४६ पासून गुरुकृपेने समाधिमंदिरातील पूजाअर्चा-धार्मिक विधी निर्विघ्नपणे संपन्न होऊ लागले. श्रीनामदेव महाराज आणि माउली काशीबाई चव्हाण यांच्या गुरुसेवेची कसोटी घेण्यासाठीच श्रीगुरुदेवांनी त्यांना प्रखर अग्निदिव्यातून तावूनसुलाखून बाहेर काढले. त्यामुळे गुरुदेवांची गुरुकृपा आणि शिष्यवर - भक्तगणांची गुरुभक्ती चिरंतन चैतन्याची झाली!

श्रीनामदेव महाराजांनी गुरुवर्य श्रीजांभेकर महाराजांप्रमाणे दीनांचे अश्रू आणि शोषितांचे दुःखनिवारण करण्याचे अपूर्व कार्य पार पाडले. अनेकांच्या व्याधी संपुष्टात आणल्या. ते अंतर्ज्ञानी होते. दुसऱ्यांची मनोगते ते अचूक ओळखत असत. पहाटेची काकडआरती ते कधीही चुकवत नसत. पूजाअर्चा झाल्यावर चहापान करीत. भोजनानंतरच्या विश्रांतीनंतर संध्याकाळी दर्शनास आलेल्यांशी सुसंवाद करीत. त्यांना मार्गदर्शन करीत. बऱ्याच वेळा त्यांच्या अवधूतलीला सुरू असत. कधीकधी स्वतःशीच बोलत बसत. कधीकधी आवारात सतत येरझारा घालीत. मध्यरात्री उठून एकटेच फिरत. १६-१६ दिवसांचे मौनव्रत केव्हा केव्हा पाळीत. कधीकधी कित्येक दिवसांचा उपवास करीत. कधी कधी एका पायावर उभे राहून अनुष्ठान करीत. लहर लागताच कुणाही भक्ताच्या घरी जात

असत. विदेही अवधूत योग्याची सर्व लक्षणे श्रीनामदेव महाराजांच्या ठायी होती. षड्रिपूंवर त्यांचा पूर्ण संयम असे. अखंड ब्रह्मचर्याचे पालन केल्याने भूतभविष्याचे कथन करण्याची अतींद्रियशक्ती त्यांना प्राप्त झालेली होती. गुरुप्रेम, गुरुभक्ती आणि गुरुसेवा यांचा सम्यक आविष्कार व्यक्त करताना जीवनात त्यांनी जे सहन केले त्याला तोड नाही...!

अंतिम शेवटच्या दिवसाची चाहूल श्रीनामदेव महाराजांना लागली होती. 'श्रीरामकृष्णनाथा दयासागरा कृपा करा- दयासागरा कृपा करा' असा स्वरचित मंत्र ते सातत्याने म्हणत असत. समाधिस्थ होण्याच्या आधीच्या आश्विन - नवरात्र अष्टमीला जगदंबेच्या वेषात रूपात जाऊन मंदिराच्या आवारात त्यांचा हा मंत्रघोष करीत असतानाच 'तरतरीत मेंदू आणि कंपनी दहा रुपयांचा शेअर' उद्घाटन समारंभ मार्गशीर्ष शुद्ध पंचमी, अशी भविष्य संकेताची घोषणा नामदेव महाराजांनी केली. मार्गशीर्ष पंचमीच्या दिवशी वामकुक्षी झाल्यावर काशीबाईंना हाक मारून श्रीनामदेव महाराज त्यांना म्हणाले, ''काशीबाई, तुझं नाव होईल बरं. तेवढं माझं होणार नाही.'' यामागील निर्भेळ संकेत हाच होता, की पुढील भविष्यात महाराजांचे कार्य सतत अधिक प्रमाणात चालू राहणार आहे. म्हणजेच गुरुशिष्या माउलींना भावी उन्नत जीवनाची प्रेरणा मिळावी. समाधिस्थ होण्यापूर्वीच काही दिवस गुरुभक्त कै. आप्पा जगदाळे मुंबईत आले होते. त्यांना पाहून आनंदित झालेले श्रीनामदेव महाराज केळकर म्हणाले, ''आप्पा! तू आलास हे फार चांगलं झालं. तुला इकडे बोलावून घेण्याच्या विचारात होतो.''

पूर्वसूचित संकेताप्रमाणे मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस श्रीरामकृष्ण महाराजांच्या सद्शिष्याने म्हणजेच नामदेव महाराजांनी दि.१६ डिसेंबर १९५८ रोजी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास नश्वर देहाची खोळ त्यजिली आणि ते ब्रह्मीभूत झाले. ******* ******* ******* ***

श्रीनामदेव महाराज केळकर यांच्या शिष्या - माउली काशीबाई चव्हाण

श्रीरामकृष्ण महाराज असल्यापासून श्रीमाउली काशीबाई चव्हाण यांचा मठात वावर होता. त्यांच्यानंतर श्रीनामदेव महाराजांच्या समवेत समाधिमंदिर स्थानाच्या रक्षणात श्रीमाउली काशीबाई, श्रीनामदेव महाराजांच्या पश्चात म्हणजे डिसेंबर १९५८ नंतर त्याच मठाच्या उत्तराधिकारी झाल्या. योगायोगाने श्रीमाउली काशीबाई चव्हाण यांचा जन्म इ.स. १९०१ मध्ये राजापूर तालुक्यातील भुतेखण गावचा. समाधिमंदिराचे तिन्ही दीपस्तंभ एकाच तालुक्यातील म्हणजेच परिसरातील हा संस्मरणीय योगायोग आहे. त्यांचे बालपण अतिशय कष्टात गेले, दारिद्र्याला सामोरे जावे लागले आणि शिक्षणापासून पूर्ण वंचित राहावे लागले. दोन वेळच्या अन्नासाठी खूप काबाडकष्ट आईबरोबर त्यांनी केले. वडील अकाली निधन पावले. काका हरिभाऊ अपंडकर यांनी काशीबाईंचा विवाह केशकर्तनालयात काम करणाऱ्या होतकरू श्री. हरिश्चंद्र चव्हाण या तरुणाशी करून दिला आणि संपूर्ण कुटुंबालाच मुंबईत आणले. काका श्रीसद्गुरू रामकृष्ण महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते आणि त्यांच्याच समवेत श्रीमहाराजांच्या दर्शनाची सुसंधी लाभली.

त्या वेळी महाराजांचा मठ प्रभादेवीला होता. काशीबाईचे यजमान नेहमी आजारी असत. त्यांची आई म्हणजेच काशीबाईंची सासूबाई खाष्ट आणि दुष्ट

स्वभावाची होती. काशीबाईंनी सर्व काही निमूटपणे सहन करीत यजमानांच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी श्रीमहाराजांच्या उपदेशानुसार २१ गुरुवारांचे व्रत केले. आजारपणामुळे रोजंदारीवर खाडे होत. त्यामुळे उत्पन्नाभावी सासरीसुद्धा काशीबाईंच्या नशिबी दारिद्र्यच आले. अशा दुःखद अवस्थेत एकच सुखाचा विसावा म्हणजे गणपत हा त्यांचा मुलगा. श्रीजांभेकर महाराजांवर त्यांची श्रद्धा अढळ होती आणि त्या गुरुदेवांची सेवा करीत उदरनिर्वाहासाठी काबाडकष्ट करीत राहिल्या. पण दुर्दैवाचा फेरा थांबला नाही. इ.स. १९३७मध्ये पतिनिधन झाले, तर इ.स. १९४३मध्ये लहानगा गणपत पण देवाघरी गेला. काशीबाई विनापाश बनल्या. मायेच्या बंधनात राहून चारचौघांसारखे सामान्य जीवन जगण्यासाठी त्यांचा जन्म नव्हता. गुरुसेवेला त्यांनी अखंड वाहूनच घेतले आणि तेच जीवनाचे एकमेव ध्येय ठरविले.

सामान्य सेवेकरी म्हणून श्रीजांभेकर महाराजांच्या मठात काम करणाऱ्या काशीबाईंनी श्रीमहाराजांच्या नंतर गुरुबंधू श्रीनामदेव महाराज केळकर यांचे मनसुद्धा कमालीचा सोशीकपणा, प्रखर गुरुनिष्ठा आणि सेवाव्रती स्वभाव यांच्या बळावर जिंकले. आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून मोठ्या धैर्याने समाधिस्थानाचे रक्षण केले. अनन्वित छळ, त्रास, अपमान यांची पर्वा न करता गुरुसेवा आणि गुरुबंधूच्या सेवेत त्या अचल आणि एकनिष्ठ राहिल्या. पंचप्राण पंचत्वात विलीन करताना श्रीनामदेव महाराजांनी काशीबाईंना दिलेला आशीर्वाद अक्षरशः खरा ठरला होता आणि त्यांच्या पश्चात समाधिमंदिराच्या त्या उत्तराधिकारी झाल्या. नामदेव महाराजांच्या पश्चात तब्बल १८ वर्षे त्यांनी जनसेवा केली. श्रीगुरुदेव, श्रीगुरुबंधूप्रमाणेच त्यांचे कार्यस्वरूप होते. वाचासिद्धी त्यांना केव्हाच प्राप्त झाली होती. त्या सिद्धीच्या बळावर अनेकांच्या व्याधी-संकटे त्यांनी दूर केली. संतती, संपत्तीचा लाभ भक्तगणांना घडवला. या कार्यात कांकणभर त्या सरसच ठरल्या. कोर्टाच्या अनुकूल निर्णयानंतर आणि श्रीनामदेव महाराजांच्या महानिर्वाणानंतर स्मशान कमिटी बरखास्त होऊन महापालिकेचे व्यवस्थापन सुरू झाल्याने समाधिमंदिराचा वृथा त्रास संपला आणि त्यांनी एकच ध्यास घेतला, की श्रीगुरुदेव आणि श्रीगुरुबंधू यांचे भजन-पूजन निर्वेधपणे पार पाडायचे! काशीबाईंनी आपल्या कारकिर्दीत गुरुवैभव वाढविले. गुरुमंदिर, साधक कुटी, श्रीनामदेव महाराज मंदिर, अशी कामे त्यांनी संपन्न केली. श्रीसमाधिमंदिराच्या समोरून जाणाऱ्या दक्षिणोत्तर रस्त्यास नगरसेवक श्री. वाघधरे आणि इतर यांच्या साहाय्याने, महापालिकेकडून 'परमपूज्य जांभेकर महाराज पथ' असे नामाभिधान करवून घेण्यात श्रीमाउली यशस्वी झाल्या आणि एकप्रकारे सर्व कार्यास महापालिकेची औचित्यपूर्ण संमती आणि पाठिंबा मिळविला. श्रीजांभेकर महाराज सेवा समिती'ची रीतसर स्थापना करून समाधिमंदिराच्या व्यवस्थापनाचा आकृतिबंध तयार केला आणि गुरुपरंपरेतील सर्व भक्तजनांना सुसंघटित करण्याचे असामान्य कार्य श्रीमाउली काशीबाईंच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले. चरित्रलेखक श्री. पु. बा. कुलकर्णी यांच्याकडून श्रीरामकृष्ण महाराज आणि श्रीनामदेव महाराज यांचे चरित्रग्रंथ प्रकाशित करून त्यांची जणू वाङ्मयीन चिरंतन स्मारकेच त्यांच्याकडून उभारली गेली. या दोन्ही सत्पुरुषांची जीवनगाथा त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली असल्याने चरित्रलेखनाच्या कामात त्यांचा सहभाग संदर्भकोशासारखा झाला.

इ.स. १९५९ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वराच्या तीर्थयात्रेला गेल्या असता ताबडतोब मुंबईला समाधिमंदिरात निघून येण्याचा त्यांना साक्षात्कार झाला. त्यानुसार त्या परतल्या असता काही आततायी मंडळी मंदिराच्या परिसरात धुडगूस गोंधळ घालून समाधिमंदिराच्या पावित्र्याला गालबोट लावण्याच्या प्रयत्नात असल्याचे त्यांना आढळून आले. मोठ्या धैर्याने भक्तांच्या साहाय्याने एखाद्या रणरागिणीप्रमाणे नामघोष-भजन करीत सर्वांना समजावले. आततायी समुदायांतील वयोवृद्धांना माऊलींची तळमळ कळून चुकली. त्यांनाही उपरती झाली आणि मोठ्या अरिष्टातून समाधिमंदिराची सुटका त्यांनी करविली.

माउलींचा लाडका मुलगा गणपत १९४३ मध्ये देवाघरी गेला आणि त्यामुळे दिवसभर - अहोरात्र त्या विमनस्क असत. त्या वेळी नामदेव महाराज म्हणत, ''मी तुला तुझा मुलगा मिळवून देईन.'' आप्पा जगदाळे एक दिवस समाधिस्थानावर आले. तेथील वातावरणाशी ते इतके एकरूप झाले, की हळूहळू माउलींच्या ठायी आप्पांना माता दिसू लागली. माउलींनासुद्धा आप्पांबद्दल जिव्हाळा आणि पुत्राची ओढ वाटू लागली. आप्पांच्या आजारपणात माउलींनी त्यांची सेवा केली. इतकेच काय, आप्पांच्या पत्नीला मायाळू आणि प्रेमळ सासूचे सुख दिले, आप्पांच्या मुलाबाळांसाठी माउलीने कष्ट उपसले. गुरुभक्त आप्पा जगदाळे यांनीसुद्धा पोटचा पोरही करणार नाही इतकी माउलींची सेवाचाकरी केली. शेवटच्या आजारपणात ती. आप्पांनीच माउलींची सेवाशुश्रूषा केली. आप्पांच्या पत्नी श्रीमती गंगाबाईनीसुद्धा तितक्याच कर्तव्यबुद्धीने आप्पांना साथ दिली. नामदेव महाराजांच्या अभिवचनाप्रमाणे खरोखरच वास्तवतेत आप्पांच्या रूपाने श्रीमाउली काशीबाईंना पुत्र मिळाला होता.

उपकारापुरत्या उरलेल्या माउली परोपकारार्थ अखेरपर्यंत झिजत होत्या. वयाच्या ७४ व्या वर्षी कष्टाने थकलेला देह जराजर्जर झाला. व्याधींनी ग्रासले. दि.२५ सप्टेंबर १९७६ ला आश्विन शुद्ध द्वितीया, पहाटेच्या पाचच्या सुमारास गुरुस्मरण करता करता त्यांनी आप्पांना पाण्यासाठी खूण केली. आप्पांनी पळीने पाणी पाजले. मग सारे क्षणार्धात शांत झाले. अत्यंत शांतपणे श्रीमाउली गुरुचरणी विलीन झाल्या. आदर्श शिष्या, आदर्श गुरुभगिनी, परोपकारी संत महिला उत्तम व्यवस्थापिका, उत्तम संघटक, दीनदुबळे. गरिबांची माता, भक्तांचा आधारवड अशा विविध भूमिकांत माउली काशीबाईंचे जीवनचरित्र दीपस्तंभवत चिरंतन मार्गदर्शक आणि प्रेरक ठरणारे आहे. ******* ******* ******* ******* ******* ******* **

माउली काशीबाई चव्हाण यांचे उत्तराधिकारी - श्रीआप्पा महाराज जगदाळे

माउली काशीबाई चव्हाण यांचे पुत्रवियोगाचे दु:ख दूर करण्यासाठी श्रीनामदेव महाराजांनी माउलींना श्रीआप्पा महाराज जगदाळे यांच्या रूपाने पुत्र बहाल केला. श्रीआप्पा महाराजांनीही आयुष्यभर आपल्या पुत्रधर्माचे पालन केले.

माउलींनी श्रीजांभेकर महाराज समाधी मंदिराचा जो वारसा त्यांच्याकडे सोपवला तो त्यांनी मोठ्या समर्थपणे तर पेललाच एवढेच नव्हे तर, त्या स्थानाला एक नवे वैभव मिळवून दिले.

श्रीजांभेकर महाराजांचे एक भक्त श्री. फुलसुंदर यांच्यामुळे श्रीआप्पा महाराजांचा या स्थानाशी ऋणानुबंध जुळला. अर्थात हे विधिलिखित होते. नाहीतर नगर जिल्ह्यातल्या पारनेरजवळच्या बाभुळवाडे गावच्या श्रीआप्पा महाराजांचे नोकरीसाठी मुंबईत कसे येणे झाले असते? मुंबईत आल्यावर थोड्याच दिवसात श्रीआप्पांना नोकरी मिळाली पण, आप्पांना मनातून अध्यात्माची ओढ असल्याने केवळ पोटार्थी चाकोरीत त्यांचे मन रमत नव्हते. शिष्याच्या मनातील तीव्र तळमळ ओळखून सद्गुरू त्याला मार्गदर्शन करण्यासाठी धावून जातात या नात्याने श्री. फुलसुंदरांतर्फे श्रीजांभेकर महाराजांनी आप्पा महाराजांना आपल्या स्थानाकडे आकर्षून घेतले.

श्रीआप्पांना जरी श्रीजांभेकर महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन झाले नसले तरी, त्यांच्या सत्शिष्यांच्या- श्रीनामदेव महाराज केळकर आणि माउली काशीबाई चव्हाण यांच्या तालमीत त्यांनी श्रीआप्पांची आध्यात्मिक जडण घडण करवून घेतली. या काळात श्रीनामदेव महाराजांनी आप्पांची बऱ्याच वेळा कठोर परीक्षाही घेतली पण, प्रत्येक परीक्षेत श्रीआप्पा यशस्वीच ठरले. श्रीआप्पा महाराजांनीही परंपरागत गुरुसेवेचा वारसा जपला.

श्रीआप्पा महाराजांच्या कारकिर्दीत समाधी मंदिराला बऱ्यापैकी स्थैर्य प्राप्त झाले असले तरी, ही वाटचाल काही सोपी नव्हती पण, गुरुवचनावर विसंबून आपल्या परीने प्रयत्न करीत आप्पा आयुष्यभर वावरले.

मठाधिपती असूनही गुरुस्थान स्वच्छतेपासूनची सारी कामे श्रीआप्पा महाराज स्वत: गुरुसेवा भावनेने करीत. त्याचबरोबर समाधीस्थानी येणाऱ्या भक्तांना सन्मार्गाकडे नेणे, ज्याच्या त्याच्या वकुबाप्रमाणे त्याची त्याची उन्नती करणे व सद्गुरुमहिमा दिगंत करणे हेच श्रीआप्पा महाराजांनी आपले जीवित कार्य मानले होते.

मठाधिपती असताना श्रीआप्पा महाराजांना अनेक संकटांचा आणि प्रलोभनांचा सामना करावा लागला होता पण, यातून सद्गुरू आपली परीक्षाच पहातात ही श्रीआप्पा महाराजांची ठाम श्रद्धा होती. त्यामुळे कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाताना, ''तुम्ही सांभाळा, मला सहन करण्याचे बळ द्या.'' असे ते म्हणत. श्रीआप्पा महाराजांच्या या विश्वासाला श्रीगुरु माउलींनीही कधी तडा दिला नाही. आपले कृपाछत्र त्यांच्यावर अखंड धरले.

समाधी मंदिराबाबत वा तेथे येणाऱ्या भक्तांना मार्गदर्शन करण्याबाबत श्रीआप्पा महाराज स्वेच्छेने कोणताही निर्णय घेत नसत. श्रीमहाराजांच्या आदेशानुसार अथवा पूर्वपरवानगीशिवाय श्रीआप्पा महाराज कोणत्याही कार्याला हात घालत नसत.

दादरच्या रानडे रोडवरील हाजी इब्राहिम चाळीत राहणाऱ्या श्री.गोविंद उपळेकर असह्य ताणामुळे आपले मानसिक संतुलन गमावून बसले होते. या अवस्थेतून माझी सुटका करा असे त्यांनी श्रीआप्पा महाराजांना विनवले. नेहमीच्या प्रथेप्रमाणे श्रीआप्पा महाराजांनी मनोमन जांभेकर महाराजांनी कौल लावला. त्या संदर्भात होकार व उपाययोजनेस आदेश मिळाल्यावर श्रीआप्पा महाराजांनी उपळेकरांना आपल्या डोळ्यांत एकटक पाहण्यास सांगितले. जवळजवळ पंधरा मिनिटे हा त्राटकोपचार सुरू होता. त्यानंतर दोन दिवसांनी श्रीआप्पा महाराजांनी त्यांना पुन्हा यायला सांगितले. त्या दिवशीही उपळेकरांवर त्राटकोपचार

करण्यात आला. त्या दोन दिवसांच्या उपचाराने श्री. उपळेकरांचे दुखणे कायमचे पळाले.

भक्त आपदानिवारण आणि गुरुमहिमा वाढविण्यासाठी बदलत्या काळाची पावले ओळखून समाधीमंदिरात सामुदायिक पोथीवाचन, संजीवन लहरी त्रैमासिक आदी उपक्रम श्रीआप्पा महाराजांनी सुरू केले. अखंड गुरुसेवेचा ध्यास घेतलेल्या श्रीआप्पा महाराजांनी जरी ते रुढार्थाने प्रापंचिक असले तरी, स्वत:चा प्रपंच साक्षीभावाने, कमलपत्रवत अलिप्त राहूनच केला.

चंदन जसे स्वत: झिजून सर्वांवर सुवासाची पखरण करते त्याचप्रमाणे श्रीआप्पा महाराजांनी भक्तसंकटे दूर करण्यासाठी स्वत: देहकष्ट सोसले. दि. २१ ऑगस्ट २००९, भाद्रपद शुद्ध प्रतिपदा, शके १९३० रोजी श्रीआप्पा महाराज जगदाळे गुरुचरणी विलीन झाले. सद्गुरू रुपात एकरुप झाले.

नामदेव महाराज आणि श्रीआप्पा महाराज यांचा समाधिमंदिरातील प्रवेशाचा अनुभव विलक्षण साम्यतेचा ठरला माउली काशीबाई चव्हाण यांच्या पश्चात समाधिमंदिराचे आप्पाही मठाधिपती झाले. त्यांच्याकडून संपन्न झालेले कार्य निश्चितच भूषणावह आणि गौरवार्थ ठरले आहे. गुरूभक्तपरायण आणि माउलीचे मानसपुत्र वंदनीय आप्पासाहेब जगदाळे यांनी दूरदृष्टी, निश्चय, अढळ श्रद्धा, परोपकारी निरपेक्ष वृत्ती, भक्तिपूर्ण परिश्रमांच्या माध्यमातून समाधिमंदिरात त्रिगुरुवर्यांची शिकवण अखंड प्रवाहित ठेवली. दरवर्षी तिन्ही सद्गुरूंचे पुण्यस्मरण, विविध धार्मिक कार्ये, जपानुष्ठान, महारुद्र, सत्संग, प्रार्थना, पोथीवाचन आणि पारायण, रामरक्षा पठण, नवरात्र उत्सव (आश्विन/चैत्र), गुरुपौर्णिमा, जन्माष्टमी, श्रीदत्तजयंती आदी धार्मिक उत्सवांची मांदियाळी मा. आप्पांनी मूर्तस्वरूपात ठेवली. सधर्म, नीती, भक्ती, उपासना, शुद्धाचरण, ईश्वरनिष्ठा, धर्मनिष्ठा, सत्धर्म- स्वदेश- सदाचरण यांचे अखंड प्रबोधन व्हावे म्हणून इ.स. १९८९ च्या सुमारास त्रैमासिक 'संजीवन लहरी'ची स्थापना केली आणि त्याप्रमाणे त्रैमासिक कार्यरत राहणार आहे. गेल्या काही वर्षात समाधी, संप्रदाय, शंकराचार्य, मंत्रसामर्थ्य, श्रद्धा, विविध गीता, ज्ञानेश्वरी, अठरा पुराणे आदी विविध विषयांवर दिवाळी विशेषांक प्रसिद्ध करण्याची अभिनव कल्पना मा. आप्पांचीच होती. २००९ पासून त्रैमासिकाच्या संपादकीयातून भारतातील इतर राज्यांतील विविध संतसत्पुरुषांचे चरित्रगायन करणे ही कार्यवाहीत आलेली कल्पनासुद्धा मा. आप्पांचीच आहे. त्याशिवाय तिन्ही सद्गुरूंची चरित्रे, नित्यपाठाचे भक्तिबोधामृत, आरत्या, प्रार्थनापदे, राम नाम-काशी काव्यसंग्रह, बिल्वपत्र, गुरुमंत्र ॐ श्रीरामकृष्णनाथा दयासागरा कृपा करा। दयासागरा कृपा करा।। ही ध्वनिफीत, रामकृष्ण बावनी आदी प्रकाशनांचे महत्त्वपूर्ण कार्य मा. आप्पांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले आहे.

२०१४ मधील समाधिमंदिराच्या अमृतवर्षाच्या कार्यक्रमाप्रीत्यर्थ गुरुमंत्राचा ७५ लाख जपपठणाचा नियोजित कार्यक्रम मा. आप्पासाहेबांनीच निर्देशित केला होता. निस्सीम गुरुभक्ती आणि उत्कट श्रद्धा यांतून स्फुरणाऱ्या अतींद्रिय ज्ञान आणि साक्षात्कार यांच्यायोगे दु:खाने गांजलेल्या कित्येक संकटग्रस्त भक्तांच्या जीवनात आनंद-समाधानाचे वातावरण मा. आप्पांनी निर्माण केलेले होते. अशा प्रकारचे दिव्य-भव्य कार्य करीत श्रीआप्पांनी दिनांक २१ ऑगस्ट २००९ रोजी नश्वर देह खाली ठेवला. समाधिमंदिराच्या परिसरात या महान गुरुभक्ताचे साजेसे स्मृतिमंदिर उभारण्यात आलेले आहे. * ***** *****

गंधर्व नगरी

अमोल मोती तथा रत्न खाणी । उदरी जयाच्या तथा सन्निधानी ।
चिरशांती घे योगी अघटीत करणी । लक्ष्मीपिता, निष्कांचन एक स्थानी ।।१।।
श्रीरामकृष्णा दिसे स्वप्न नामी । वटवृक्षवेली जरी क्षारभूमी ।
वाळूकणां माजी सुकुमार केळी । सवें खेळती मुग्ध नवकुसुम जाळी ।।२।।
शुचिर्भूत होई गुरुची समाधी । जलोऽदकाने प्रक्षाळी उदधी ।
वेदोऽक्त स्तोत्रें गंभीर लहरी । उच्चैःस्वरे गाती सायंसवेरी ।।३।।
जिथें मूर्त करुणा, जिथें मूर्त प्रीती । जिथें लाभते पूर्ण सायुज्य भक्ती ।
अशी मृत्यूलोकी उभी शांत नगरी । गुरुस्वप्न हो पूर्ण गंधर्व नगरी ।।४।।

।। मंगलाचरण ।।

अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः । ॐ नमो श्रीगौरीनंदना । विश्ववंद्य तूं सिंदूरवर्णा । मंगलकार्यीं करुनी स्तवना । शुभारंभ जन करिती ।।१।। आजी चरित्र गायन करण्या । रामकृष्ण श्रीस्वामी दाविण्या । सन्निध बैसुनी बुद्धि देण्या । झडकरी यावे गजानना ।। २ ।। मंगलमूर्ती विघ्ननाशका । शरणांगता वरदायका । श्रीरामकृष्ण कवतुका । प्रकट करावें मत्हृदयीं ।। ३।। बुद्धिदेवते विद्यामाते । धरुनी अंगुली निज करातें । दिव्याक्षरें जीवनाते । रेखाटावे श्रीस्वामींचे ।।४।। तेजदेवता श्रीगायत्री । जीवनदाता अध्यात्मधात्री । देवभक्तीची उज्ज्वल ज्योती । तेजांकित करी स्वामी ।। ५ ।। श्रद्धाभक्तिध्यानसाधनां । सद्गुरुदर्शित मार्गक्रमणा। येणें साधी आत्मविकसना । श्रीरामकृष्णमहाराज ।। ६।। पूर्वसुकृतसंगे घेउनी । येती श्रीस्वामी भुवनीं । मोह मद मत्सर त्यजुनी । नर होई नारायण ।। ७।। देवदर्शना जीव तळमळे । धनदौलत अर्थ नाकळे । ध्यास लागला एक विठ्ठले । रखुमाईपायीं ।। ८ ।। तगमग अंतरीं दाह शरीरीं । ईश्वर भेटे नाहीं जोंवरी । निरर्थ जगणें भार भूवरी । अविरत मन आक्रंदे ।। ९।। स्मशानभूमी निकट तडागीं । जाती देहा त्यागालागी । तथापि सय्यद बाबा योगी । मंत्र देऊनी सांवरी ।।१०।। सय्यदबाबा फकीर प्रकटला । दर्गा

त्यजुनी भूवरी आला । देवभेटीसी व्याकुळलेला । रामकृष्णा सांवरी ।।११।। तदनंतरी स्वामी जीवन । अर्पुनी अपुले देहमनधन । करुनी सकलां दु:खनिवारण । असार संसारी जगले ।।१२।। भार्या अपत्य होता वियोग । समस्त जन तैं विस्तृत जग । स्वामींचा हो जीवन भाग । पिताजननी ते सकलां ।। १३ ।। रुग्णपीडितां देव देखती । सेवाधर्मीं अत: रमती । ईश्वराचे पुत्र शोभती। खरोखरी श्रीस्वामी ।। १४ ।। तपः साधना रामकृष्णें । करितां स्वामी समर्थराणें । प्रसन्न होऊनी बहुकृपेनें। द्वैत पूर्ण हारिलें ।।१५।। ऐहिक, लौकिक जीवन नुरले । रामकृष्ण श्रीसमर्थ झाले। स्वामीसमर्थरूप पावले । अहर्निश संवाद करी ।। १६ ।। भाविकजन हो, आजवरी । सद्‌गुरुस्वामी कृपा करी । भक्तजनांचे संकट हारी । सत्य असे हें त्रिवार ।।१७।। श्रीरामकृष्णसद्‌गुरु । करिती शिष्यां भवपारु । त्यांचे चित्तीं वसे निरंतरु । धन्य धन्य ते भक्त ।। १८ ।। श्रीस्वामींचे घेतां दर्शन । करिता स्वामींचे श्रीस्मरण । धरितां स्वामीं श्रीचरण। शांतिसौख्य भक्तांसी ।। १९।। निरंतर ध्यावा गुरुदेव । मनीं असावा निश्चयभाव । प्राप्त तेणें अगम्य वैभव। अतुलनीय असीम ।। २० ।। म्हणोनी श्रीसद्‌गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी। बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। २१ ।। इति अध्याय पहिला समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। बालपण ।।

अध्याय दुसरा

श्रीगणेशाय नमः । 'वासांसी जीर्णानि यथा विहाय' । भगवंते कथिले धनंजयास । रामकृष्णें सिद्ध केले वचनास । निज पुण्यचरित्रें ।।१।। आत्मा सांडोनी पूर्व कुडी । इहजन्मी धरी आवडी । रामकृष्ण जांभेकर जोडी । नांव नूतन तनुसी ।। २ ।। परी सुकृत संगे येई । रामचरित्रीं अति नवलाई । मंत्र जपाने वेडे होई । रामकृष्ण चित्त ।। ३।। पोंबुर्लेची भूमि पावन । स्वामींचे ते पूर्वजस्थान । बाळशास्त्री असामान्य । जन्मती तये स्थळीं ।।४।। जैसी कीं गंगामाई । अवचित ये राजापुर गावी । मंगल पवित्र तेणे होई । राजापुर ग्राम ।।५।। तातबंधू ते मोरोबाजी । जनक तसे कीं अंतोबाजी । आसक्ती त्यां नाट्यकलेची । रामलीला करिती ।।६।। विविध नगरीं बंधु जाती । राजाधिकही आमंत्रिती । रामकथेने चित्त थरकती । होती जन मुग्ध ।।७।। परंतु अघटित कसे जाहले । भांडण तंटे 'मंडळ' फुटले । दिशाहीन दो बंधु जाहले । राहिले पर प्रांती ।।८।। नाटक मंडळ जधीं फुटले । सहकारी जन सकल पांगले । दैव तथापि प्रसन्न हंसले । मोराबांवरी अखंड ।। ९ ।। 'गवालमंडी' नांवे परिचित । विभाग ग्रामी होता ख्यात । देवीमंदिर एक तेथ । होते पुण्यशाली ।।१०।। देवीमंदिरीं

मोरोबांसी । मीरत नगरीं नगर निवासी । म्हणती तुम्ही श्रीदेवीसी । पूजावें हो नित ।।११।। समीप देती नगरनिवासी । सदन एक पुजाऱ्यासी । तथा तयाच्या बंधूसीही । निवांत प्रसन्न शांत ।।१२।। देववाणी मोरोबांवरी । कृपा करी हो बहुसरी । अतः जन अवघे सत्वरी । स्थापिती शाला एक ।।१३।। सौदागर धनवंत तथा । धनधान्यादि विपुल संपदा । सांजसकाळी विशुद्ध दुग्धा । देती मोरोबांसी ।।१४।। गृहीं नांदे सौख्य अपार । देवीकृपेचा साक्षात्कार । जनीं लौकिकीं बहु सत्कार । अंताजीसी हो आराम।।१५।। धनिकपुत्रसम अंताजी । कर्तव्यासी ना राजी । दश अपत्यें गृहामाजी । निष्क्रीय जीवन हो त्यांचे ।।१६।। मीरत ग्रामी अंताजी परी । कन्या पुत्र तथा अस्तुरी । वसती तदा मुंबापुरी । दूरी जनका पासुनी ।।१७।। सहा सुकन्या पुत्रही चौघे । अंताजींचे कुटुंब अवघे । द्वारकानामें भार्येसंगे । करिती न करतां संसार ।।१८ ।। निष्क्रीय जनका पुत्र जाणती । अतः प्रथमाश्रमी राहती । रामकृष्णही उदासवृत्ति । संन्यासी ते संसारी ।।१९।। मातुलगृहीं श्रीरामसदनीं । पत्नी जानकी कोमल तरुणी । विलीन झाली ईश्वरचरणीं । वनवासी श्रीराम गृहीं ।। २० ।। गृहस्वामिनी गृहीं न आतां । उदासीनता गृहासी येतां । मामा श्रीराम गृहस्था । जग होई शून्य ।। २१ ।। परी तयांच्या विकल मनासी । भगिनी पुत्र चंदन होती । रामकृष्णवरी अपार प्रीति । मातुलरामांची ।।२२।। प्रेमवृष्टि अविरत असतां । धनदौलतीस सीमा नसतां। कर्तृत्वासी

दाही वाटा । रामकृष्ण ना हरखले ।। २३।। गहनगूढपथ ऋषीमुनींचा । नित्यशुद्ध सत्य प्राप्तीचा । श्वासोच्छ्वासी मंत्रजपाचा । ध्यास लागे रामकृष्णां ।। २४ ।। जनाजनांच्या सुलभ मार्गा । करी लीलया म्हणुनी त्यागा । आसक्ती ना क्षणिक भोगा । अंतर्मनी ते रमती ।। २५ ।। गायत्रीजप जपती निरंतर । टपालखातीं होते चाकर । मंत्रजपाचा दृढ आधार । तेणें ऐहिक हो प्रगती ।। २६ ।। शिंगणपूरग्रामीं बढती। उच्चस्थानीं स्वामी चढती । निजकर्तव्या सदा जागती । सहज जनादर प्राप्ती ।। २७।। जनकल्याणा नित्य झगडणें । दलितांची नित सेवा करणें । रंजित गांजित हृदयीं धरणें । रामकृष्ण संत होती ।। २८ ।। तुकाराम नामा जैसे । एकनाथ तैं सावतासरसे । रामकृष्णस्वामी तैसे । प्रापंचिक साधु ।। २९ ।। निष्कर्म नर भार भूवरी । कर्मविहीन इह संसारी । अन्नसेवण्या ना अधिकारी । स्वामी म्हणती सदा ।। ३० ।। सर्वांभूती ईश देखणें । ईश्वरसेवा तीच जाणणें । तरीच मनुजा सार्थक जगणें । स्वानुभवें शिकविती ।।३१।। स्वामीजीवन सेवाधर्म । उधळुनी जगतीं दिव्य प्रेम । निजकर्तव्या श्रेष्ठ कर्म । त्रिदलरूपें व्यतिलें ।। ३२।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी। अध्याय समाप्ती करी ।। ३३ ।। इति अध्याय दुसरा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। गायत्रीमंत्र ।।

अध्याय तिसरा

श्रीगणेशाय नमः । अवनीवरी विविध जीवाणु । अंतस्थ वसे नारायणु । जाणी जो मानव सगुणु । श्रेष्ठ तोची भूवरी ।। १।। पुरुषांमाजी श्रेष्ठ कनिष्ठ । पूर्वसुकृताची जैसी जोड । जन्ममृत्युचक्र सांडे । भाग्यवंत तो उपजे ।। २।। क्षुत्पिपासा निद्रेवीण । अन्य नसे जीवां जीवन । त्यासी अटळ जननमरण । करंटा तो भूमंडळी ।। ३ ।। रामकृष्ण श्रीमहाराज । जन्मजन्मींचा सुकृतसाज । दिव्यत्वाचा तो अधिराज । रत्नमणी हा नरपुंगव ।।४।। जननी गर्भीं एक जन्म । मौंजीबंधनी पुनर्जन्म । प्रवाहपतितां नकळे मर्म । नाममात्र तो द्विज ।।५।। मौंजीबंधनसमयीं कर्णीं । गायत्रीसी दिव्य कथुनी । बटुबालका मनीं । जनक स्पर्शी पुण्याई ।।६।। श्रीगायत्री चराचरासी । संजीवनी ती अहर्निशी । क्रीडतसें तेजे विश्वीं । तमहारिणी सत्य ।।७।। पापनाशिनी तेजस्विनी । मानवचित्ता निर्मल क्षणीं । करीतजाणी नरशिरोमणी । रामकृष्ण महाराज ।। ८ ।। अम्बरीचा तेजोनिधी । विशुद्ध होई भूमी उदधि । गायत्री करी उदारधी । रामकृष्णस्वामींसी ।। ९ ।। निद्रीं

जागृती जरी कर्मरत । अलौकिक ते मंत्रा जपत । तेणें चित्तीं दिव्य ज्योत । उजळे श्रीहृदयीं ।।१०।। किल्मिश सरले, प्रकाश उजळे । हें विश्वचि श्रीमय झाले । अहं भाव पूर्ण निमाले । साक्षीरूपें उरला जीव ।।११।। आतां एकची वांच्छा मनीं । परमेश देखणें निजनयनीं । तळमळे जीव त्याकारणीं । ध्यानीं स्वप्नी मंत्रजप ।।१२।। सुरतनगरीं करी चाकरी । टपालखातीचे अधिकारी । परी न रमले ते व्यवहारी । अंतरी ध्यान गायत्रीचे ।।१३।। रस्सीखेची तनामनाची । देहा जाण कर्तव्याची । जीवा ओढ ईश्वराची । विचित्र जीवन संसारी ।।१४।। म्हणे देह जावो राहो। पांडुरंगी माझा भावो । जरी विठ्ठल नाहीं पावो । अर्पिन कुडी विठूचरणी ।।१५।। प्राण थकले करुनी धांवा । तरी न दर्शन देई देवा । असह्य तगमग होई जीवा । जलविना कीं मत्स्य ।। १६ ।। प्राणवायु जैसा सरतां । मीन तडफडे सलील नसतां । अंती त्यजुनी भीषण जगता । शांतिलाभ हो त्यांसी ।।१७।। स्मशान सन्निध तडागकाठी । अंध:कारी भयाण राती । ईश्वरनाम जागृत चित्तीं । रामकृष्ण पातले ।।१८।। तटाकीं तिष्ठति प्रणाम करुनी । हृदयी विनम्र हरीहरचरणीं । निर्जन, निर्रव, एकाग्र नयनीं । कृष्णजला निरखिती ।।१९।। वंदुनी श्रीउदक देवता । उडी टाकण्या हो सिद्धता । अवचित कोणी धरुनी कंठा । गर्जुनी श्रींसी वदले ।।२०।। अंधारी ना कुणा देखिले । शब्दरूप

परी स्पष्ट जाणले । कठोर वाणी तीव्र पुशिले । जीव अर्पिसी का जली ? ।।२१।। देवभेटीची आंस जीवां। करुणा ना ये हरी माधवा । अतः जाई देवागावा । शांतभावे श्री वदले ।। २२ ।। साक्षात्काराविना जीवना। नसे अर्थ कृपया जाणा । रक्षक तुम्ही जल की वना । हे देव देवता, क्षमा असावी ।। २३ ।। धीरगंभीर वाणी बाही । संगे येई ईश्वर पाही । म्हणुनी दर्ग्यासन्निध नेई । तेथ देई मंत्र कानीं ।। २४ ।। वरदहस्त शिरीं ठेविला । क्षणांत अंतर्धान पावला । सय्यदबाबा नाम अवलिया । सद्गुरु हो श्रीस्वामींसी ।।२५।। इष्टसिद्धीची हो पूर्तता । क्षणांत शांति लाभे चित्ता । कर्म, वैखरी हो प्रगल्भता । यौवन फुलले अध्यात्मी ।। २६ ।। सखेसोयरे तदा विनविती । गृहस्थधर्मा अंगीकारती । पाध्ये दुहिता भार्या होती । सुखेन होई संसार ।। २७ ।। प्रपंच चाले अति नेटका । परमार्थीही शुद्ध विवेका । जीवनीं अवघड मार्ग अनेका । तरी तयांसी सुलभ तदा ।। २८ ।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी। अध्याय समाप्ती करी ।।२९।। इति अध्याय तिसरा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। संसार ।।

अध्याय चवथा

श्रीगणेशाय नमः । ईश्वरेच्छा बलीयसी । ज्ञात नसे मानवासी । शालक सीतारामांसी । प्रेरणा हो तदा ।। १।। रामकृष्णांसी सीतारामें । पाचारिले पंजाबग्रामी । रामकृष्णही जाती प्रेमें । पत्नीसह म्हणोनी तेथ ।। २ ।। पेशावरनगरी टपालखातीं । पुनरपी चाकर सहजी होती । साधुत्वाची तेथ प्रचीति । नगरनिवासीयां होई ।। ३।। संतजनांच्या मार्गावरी । दुर्गम, कठोर, मोहक तरी । अविरत चाले स्वामीस्वारी । प्रमुदित उल्हास मने ।।४।। अमृतसर लाहोरनगरी । सत्कर्माचा हार मनोहरी । गुंफुनी वाही दलित शिरीं । परमेश्वररूप म्हणुनी ।। ५ ।। येणेंपरी प्रपंच होई । सेवाभावें ईश्वर पाही । भंवतीं आनंदाचा येई । सुगंध अपरंपार ।।६।। तुफान नव्हतें पंचइंद्रियीं । चित्तीं नित्य शांति राही । संसारीही न्यून न कांहीं । संतुष्ट ते साधनी ।।७।। विपरित होई एक प्रभातीं । कुणी अवलिया द्वारी तिष्ठति । वरदहस्त शिरी ठेविती । मंत्र देई जपण्या ।। ८ ।। भान हरपले श्रीस्वामींचें । रूप पाहती अवलियाचे । जैसे कीं ते ध्यान नियतीचे । सामोरी ठाकले ।। ९ ।। मृदु वैखरी श्रवणी आली । बा रे तोडी मोह जाळी। भार्यामाया संसार सकळी । सांडी तूं तत्काल ।।१०।। प्रपंच सौख्यें नसती तुजस्तव । विधि रेखितो गूढ अपूर्व । देवअक्षरें ललाटी तव । सावधान हो रामकृष्णा ।।११।। ईश्वरेच्छा

जाणावी त्वां । सुरतग्रामीं तुज रक्षावा । अतः कथिले होते रावा । पुनरपी आजि येई ।। १२ ।। दुःखी होती तदा गृहस्थ । शालकाग्रहे तेथें येत । कन्यालता शोभा देत । संसारवृक्ष होता फुलला ।।१३।। क्वचित् दिवसानंतरी एकदा । पुनः अवलिया तटस्थ पुढता । सौम्य परी स्वरीं दृढता । वदले रामकृष्णांसी ।।१४।। अज्ञानसुषुप्ती नच शोभते। सरला तिमिर देख पराते । उष:काल नवजीवन तुज ते । बाही मूढमते ।। १५ ।। उघडी नयनें जागृत होणें। अपत्य कांता अंत साहणें । विधिलिखित तव शून्य राहणें । तुजस्तव नच प्रपंचभार ।। १६ ।। सोडचिठी दे टपालखाती । चाकरीसी तिलांजल वाती । भगिनीसी दे धनसंपत्ती । मुक्त होसी तूं देवदत्ता ।।१७।। साधु अवलिया पुनः पुनरपी । वदला ऐसे तदा तथापि । शून्यामाजी जीवन मापी । कैसा गृहस्थधर्म ? ।।१८।। दैवचक्रगति मनुजा नकळे । जीवन त्यांचे भिन्न आगळे । सहधर्मिणी बालक सगळे । विरामले अमृतसरग्रामी ।।१९।। प्रात:काळी एके दिनीं । देसाई नामक किंकर कोणी । म्हणे असे धनवंत मम धनी। कृपा करावी तयावरी ।। २० ।। नदीतटाकी स्नान होता । वदला रामकृष्ण देखता । धनिकभार्या असे पीडिता । करी मुक्त दयाघना ।। २१ ।। स्वप्नीं नित्य आत्मा कोणी । धनिककांता वदतो पीडुनी । ने बाहेरी त्रस्त कुडीतुनी । तुझिया मजसी आर्ये।।२२।। भूतात्मा पीडित नारी । विकल शरीरीं दुःखी भारी। वैभव अगणित तरी संसारी । पतीही संत्रस्त मनीं ।।२३।। धनिकदास म्हणे श्रीस्वामी । मंत्रतंत्र तूं जाणसी नामी । अतः चरणीं लीन तव मी । आपदा अपहारी प्रभो ।। २४ ।। पांचशतरौप्यमुद्रा । धनी देईल करुणसमुद्रा । मुक्त होतां कांता भद्रा । निश्चित, आण श्रीमहाराज ।। २५ ।। धनिकमहाली अत: करी । पूजाअर्चा हवन निरंतरी ।

धूपदीपधूम विचित्री । कोनाकोना व्यापितसे ।।२६।। रामकृष्ण मंत्रवाणी। घुमे महाली, धनिकगृहिणी । बैसे निश्चल कुंडा लगटुनी । वीस दिवस सरले ।। २७।। प्रार्थी तदा स्वामीमांत्रिक । मी तव दृढ भक्त साधक । किंचित् काळ हो प्रापंचिक । अव्हेरी ना भक्ता ।। २८ ।। जरी न पूर्ति होई आशा । भूतात्मा ना सोडी वृक्षा । विसर्जन मम देह पाशा । करीन होमकुंडीं ।। २९ ।। निमिषांत मंत्रदेवता । देई त्यांसी सुखदृष्टान्ता । कृपादृष्टी मम नित्य पूर्णता । कार्यसिद्धी तव होई ।। ३०।। तेच क्षणी विपरित घडले। दालनद्धार पूर्ण निखळले । रामकृष्णासान्निध पडले । मनीं चरकले स्वामी ।। ३१ ।। किंकारणें अपशकुन व्हावा । पुसती नम्रभावे देवा । कैसा अपराध पाप वा । कथी मजसी मंत्रदेवते ।। ३२ ।। अग्निदेवता तदा वदली । उघडी अंतर्दृष्टी अपुली । देवकार्यी मंत्राळली । बुद्धि तव ठेवी ।। ३३ ।। तत्पश्चात् गृहिणी कन्या । कैलासपदीं होती विलीन । धनिक न देई अल्पही धन । रामकृष्ण पूर्ण सावधले ।।३४।। साधुभविष्य सत्य जाहले । संसारीचे दीप निमाले । धनलक्ष्मीने गृहासी त्यजिले । मनीं उमलले ज्ञान ।। ३५ ।। मंत्रजपाचा ध्यास लागला । अंतर्मनीचा दाह शमला। उन्मनीचा भाव उजळला । दिव्यानंदे भरे ऊर ।। ३६ ।। आतां त्यजुनी परप्रांता । सुरतग्रामी स्वामी परतता । स्मशानसन्निध निवास करिता । शंभुनाथ शोभतो ।। ३७।। म्हणोनी श्रीसद्गुरु चरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३८ ।। इति अध्याय चवथा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। मुंबईत ।।
अध्याय पांचवा

श्रीगणेशाय नमः । सुरतनगरीं एकांतस्थानी । खंडहरसम पडिक स्मशानीं । सय्यदबाबा सन्निधानी । रामकृष्ण राहिले ।।१।। देही तरीही देही नसती । अन्नवसनाची ना क्षीति । चिंता भगवंत वाहती । उन्मनी राहती स्वामी सदा ।। २।। एके समयीं कोणी यात्रिक । स्मशानीं देखे साधु सात्त्विक । कथिता नगरवासी भाविक । जन असंख्य येती ।।३।। कोणी येती तसे परतती । अन्य जन प्रणाम करिती । कोणा चित्तीं भाव उमलती । नूतन अननुभूत ।।४।। कोणी एके भाव भक्तीनें । जाणी श्रीसद्‌गुरुचरणें । अनन्यभावे दीनपणें । वंदी चरणयुगुलें ।।५।। इष्टकामनापूर्ति होतां । भक्तराज कथी सकल गुरुकथा । जनाजनांसी भावे त्वरितां। स्वामींपाशी जन धावती ।। ६ ।। एक एका विविध व्यथा । स्पर्शी श्रीस्वामी चित्ता । तदा आळविती ते भगवंता । सहज दुरावती जन आपदा ।।७।। दुःखमुक्त होती दुःखित । जन म्हणती त्यां साधुसंत । साधुलक्षणें दिसती समस्त । रामकृष्ण जीवनीं ।। ८ ।। सुखापाठीं सकल धावती । परी न

सौख्य येई हातीं । अपार कष्टी म्हणुनी होती । पाठलाग व्यथा श्री जाणी ।। ९ ।। परमानंद मार्ग दावुनी । मन:शांतीचा प्रसाद देऊनी । भगवंताचा दूत होऊनी । जनसामान्यां देती शक्ति ।।१०।। भक्तिभावदीप उजळुनी । कठोर जगतीं तम हारोनी । जनमानसीं हो चिंतामणी । श्रीगणेशरूपें स्वामी ।। ११।। कामेरकर नामें एकदां । मुंबापुरीहुनी गृहस्थ येतां । मराठी साधु तेथ देखतां । कळवळले चित्तीं ।।१२।। कामेरकर वदले श्रींसी । कुटिर नसे ना मठाश्रमासी । शीत ऊष्ण की साहणेसी । उचित न बसणें येथ ।। १३ ।। जन अर्पिती तव पदकमळीं । धनधान्य तथा फळे आगळी । कणभर राखीसी तूं नच जवळी । निजपाशी श्रीस्वामी ।। १४ ।। प्रसादरूपें समस्त देसी । आसक्ती ना किंचित् तुजसी । जाण न कांहीं तव भक्तांसी । कुडी होई तव क्षीण ।। १५ ।। म्हणोनी देवा प्रार्थीतसे मी । यावे संगे मुंबाग्रामीं । अन्नवस्त्रनिवास नामी । अर्पीन मी त्वच्चरणीं ।। १६ ।।अनेकविध करुणावचनें । विनवी कामेरकर प्रेमें। तथास्तु अंती स्वामी म्हणे । मुंबापुरीसी जाती ।।१७।। मुंबापुर ग्रामदेवता । मुंबादेवी सकलां माता । रक्षितसे ती भाविक भक्तां । महाराजही देवीभक्त ।।१८।। देवी गायत्रीचे बालक । रामकृष्ण महाराज सात्त्विक । दोघी भगिनी करती कवतुक । बालक रामकृष्णांचे ।।१९।। जिथे न वसती शूर धुरंधर ।

भूतबंगला नामें जाहीर । तेथ रामकृष्ण नरवर । सुखेनैव राहिले ।।२०।। भूत निशाचर आत्मा कोणी । कष्ट न दे दिसे न नयनी । सावचित ते शांत साधनीं । रामकृष्ण निवसती ।। २१ ।। भूतबंगला खरीदणें । आमरणान्त तेथ राहणें । ब्रह्मानंदीं पूर्ण रंगणें । कथिले केळकरमामांसीं ।। २२ ।। भूतबंगला मालक परी । मामांसी ना विक्री करी । म्हणोनी अंतीं भाडेकरी । फकीरशेटचे होती ।।२३।। प्रभादेवी विभाग जेथ । फकीरशेट निवास तेथ । श्रीमहाराज सद्गुरु होत । भाडेकरी फकीरशेटचे ।।२४।। प्रतिमासी पंचदशशिक्के। मामा करिती करारलेखे । तेथोनी फकीर कुटुंब सुखे । कुटीरीं राही अवघे ।। २५ ।। नूतन गृहासी मामा देती । रूप नवे, नव रंगोटी। अंगणी वाढती नवी रोपटी । प्रमुदित हो अवकाश ।। २६ ।। श्रीमहाराजकृपा परिमळें । गृहासी येई रूप आगळे । निर्मल पवित्र गंगाजळे । काशी जैसी हो पावन ।। २७।। मठीं चालला हरि हरि गजर । व्रतवैकल्यें यथोपचार । सांजसकाळी आरती सुमधुर । घंटानाद जागवी देवा ।।२८।। उत्सवप्रिय अतीव स्वामी । दत्तजयंती गोकुळ अष्टमी । रामनवमी देवीअष्टमी । अनेकविध होती उत्सव ।। २९।। अक्कलकोटीय स्वामी पुण्यतिथी । तदी उत्सवा येई भरती । महाराजांची समर्थ भक्ती । उसळुन उमले उत्सवीं ।। ३० ।। 'अन्नमय प्राण' म्हणती । जीवप्राण तो ईश्वर जगतीं । अतः

अन्नदान महती । वदती श्रीमहाराज ।।३१।। प्रसादरूपें अन्न सेवण्या । भक्त येती पुण्य साधण्या । अभक्त तैसे लाडु भक्षण्या । निशिदिनीं येती नरनारी ।। ३२ ।। क्षुधित असो पतित अथवा । मठधामीं ये अशा मानवा । तृप्त करणें मठकर्तव्या । जाणा म्हणती भक्तांसी ।।३३।। देहमनाने मानवसेवा । तीच भक्ती व्हावी देवा । तेणें पवित्र सात्त्विक भावा । प्रकटे भक्तमनीं ।। ३४।। स्वामीमहाराज उत्सवीं । झटती करिती कर्में अवघी । तेणें भक्तां स्फूर्ति नवी । प्राप्त सहज अनुकरणीं ।। ३५ ।। नास्तिकासी करिती आस्तिक । आस्तिकासी तैसा सात्त्विक । साधुजनांचा मार्ग अलौकिक । नेती स्वामी सकलांसी ।। ३६ ।। निष्कांचन कीं धनिक क्षुधिता । स्वयं रांधुनी अन्न वाढितां । भक्तांचा अहंभाव पूर्णता । गळून जाई निश्चित ।। ३७।। येणें परी भक्त अभक्ता । नेऊनी नित्य सुगमा सुपंथा । निर्मम निर्मोही तत्त्वता । करी श्रीमहाराजमठ ।। ३८ ।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३९ ।। इति अध्याय पांचवा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। फकीरकन्या ।।

अध्याय सहावा

श्रीगणेशाय नमः । गुरुकृपा होई ज्यावरी । त्यासी उणे काय संसारी । निष्कांचन अविचारी । तोही हो भाग्यवंत ।। १ ।। गुरुप्रेमा ना आदि अंत । गुरु न जाणी धर्म जात । दृढनिष्ठा सेवाव्रत । तुष्टती सद्गुरु निश्चित ।। २ ।। फकीरशेट निर्धन अभागी । रिक्त सदा धान्य कणगी । बहु अपत्यें परी हतभागी । सकल तीर्थरूपसम ।। ३ ।। ऐका फकीरजन्मचरित्र । असामान्य तसे विचित्र । जैसे कीं ते 'फकीर' पुत्र । म्हणोनी निर्धन जन्मभरी ।।४।। पोटी नसे संतान म्हणोनी । फकीर जनक दु:खी मनीं । सागरतीरीं एके दिनीं । फकीर येई त्या समोरी ।। ५ ।। म्हणे बच्चा हर रोजी । भात घाली समुद्रामाजी । तेणें जळचरें तुष्ट होती। आशीर्वचनें धन्य होशी ।। ६ ।। आशा पालवतां हृदयीं । मत्स्य जळचरां जनक देई । भात नित्य सायंसमयीं । अखंड अविरत व्रत त्यांचें ।।७।। नऊ मास होतां पूर्ण । भार्या प्रसवे पुत्रसंतान । स्मरोनी 'फकीर' आशीर्वचन । जनक म्हणे 'फकीर' जन्मला ।।८।। नामकरण पुत्रा केलें । विचित्र अभिधान फकीर दिधले । स्वामीं कृपयें शेट जाहले । फकीरशेट चरित्र ऐसे ।। ९ ।। नाम तैसे भाग्य तयांचे । साकाररूप ते दुर्दैवाचे । रतननाम कन्यकेचे । जनक होते फकीरशेट ।। १० ।। रूपहीन ती वर्ण सावळा ।

ईशकृपेनें स्वभाव भोळा । संसारी हा जीव कोवळा । हतभागी परी पित्यासम ।। ११।। स्वकीय दुहितासम तिजसी । महाराज सदा लेखती । अतः कथिती केळकरांसी । फकीरकुटुंब रक्षावे ।।१२।। केळकरमामा मुक्त हस्ते । अन्नवस्त्र दे सकलांते । ललाटरेखा मार्ग बदलते । गुरुकृपा कारणें ।।१३।। काशीबाई नामें भक्त । रतनकुमारीसी वदत । सांजसकाळी अंगणात । रंगावली चित्री बाळे ।।१४।। करुनी सडासंमार्जन प्रांगणी । विचित्र रंगावली काढुनी । बाले शोभवी कुटीर निशिदिनी । सद्गुरु इच्छा प्रमाण असे ।। १५ ।। षोडश संवत्सरे सरतां । कन्यारंगरूप बदलता । यौवनीं खुलली फकीर दुहिता । प्रसन्न होती श्रीमहाराज ।। १६ ।। विवाहासी योग्य जाहली । म्हणतां स्वामी, भुली पडली । वाटे जनास कां की वेगळी । कनिष्ठ जात फकीरची ।।१७।। महाराज परी संत सद्गुरु । ज्यासी नाहीं धन आधारू । रंगरूप कीं आपसोयरू । तयांसी धरिती उरीं ।। १८ ।। एके दिनीं भांडुप निवासी । भक्त येई दर्शनासी । म्हणे गृहस्थ विचार मानसी । मंगलकार्य व्हावे गृहीं ।।१९।। पुत्र विवाहा योग्य जाहला । सद्गुरु आशीर्वादा आला । कृतार्थ करणें स्वामी, त्याजला । इच्छाकांक्षा पुरवावी ।।२०।। स्वामी त्यासी प्रेमें वदले । फकीरकन्या रूप सावळे । परी तियेचे गुण आगळे । मजसी ती कन्येसम ।। २१ ।। शुभमंगल जरी करणें । पुत्रवधु त्वां रतन नेमणें । ईश्वरेच्छा बा जाणणें । दृढ भक्ति जरी तव ।। २२ ।। साडी चोळी हळदी

कुंकुम । सौभाग्यलेणीं तशी अनुपम । फकीरकन्या निजकन्येसम । जाणुनी देई वरपिता ।।२३।। आतां लोभ व्यापी फकीरा । म्हणे वसने द्या वधुपितरा । अलंकार नव करा त्वरा । सावध होती समस्त भक्त ।। २४ ।। फकीरशेट दैवी नसती । वस्त्रभूषणें की धनदौलती । समस्त भक्त पूर्ण जाणती । महाराज परी कृपा करिती ।। २५ ।। कन्या करी सद्गुरुसेवा । तेणें बदले तिचीया दैवा । स्वामीभक्त करिती कावा । देती वस्त्रालंकार फकीरा ।। २६ ।। परतुनी घेणें सरता कार्य । चिंतिती, स्मरुनी स्वामीपाय । तेणें पाप न किंचिदपाय। वाटे धनिक श्रीभक्तांसी ।। २७ ।। जाणिली भक्तलीला फकीरें । कोपे फकीर कापे थरथरे । गमन करणें म्हणे सत्वरे । लग्नमंडपातुनी ।। २८।। केळकरमामा स्वयं जाती । फकीरासी बहु विनविती । बहुमानाने कन्येसहिती । कष्टे नेती अखेरीसी ।। २९ ।। तदा फकीर सहअर्धांगिनी । कन्यादानें कन्या अर्पुनी । वधुवरांसी दृढ आलिंगुनी । शुभाशीर्वच सुखे देती ।। ३०।। येणें परी श्रीसद्गुरुकृपा । प्रपंची हारी समस्त पापा । आशीर्वचनें संसारपादपा । वाही फलपुष्पसंभार ।। ३१।। रंजले गांजले हृदयीं धरिले। साधुसंत तेथ जाणिले । तुकाराम महाराज वदले । रामकृष्ण अतः संत ।। ३२ ।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३३ ।। इति अध्याय सहावा समाप्त।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। चमत्कार ।।

अध्याय सातवा

श्रीगणेशाय नमः । जो करी चमत्कार । तो साधु ना खरोखर । हस्तकौशल्यें जादुगर । तोही चमत्कार करी ।। १ ।। मंत्रसिद्धी दे सामर्थ्य । साधुसंतांसी क्षणमात्र । सुज्ञ जाणिती सकल तंत्र । अतः त्यांसी न म्हणती सद्‌गुरु ।।२।। सद्‌गुरु निज भक्तांचे करी । अज्ञान अंध:कार दूरी । भक्तांसी ते तमहारी । श्रीआदित्य देवासम ।। ३ ।। परी रामकृष्ण महाराज करिती । अनेकविध चमत्कार कृती । तेणें सद्‌भक्त होती कष्टी । मनोमनीं अपरंपार ।।४।। एके समयीं भक्तें एका । विनम्रभावें म्हटले ऐका । किंकारणें करिसी चुका । पामर मी मजसी वाटे ।। ५ ।। श्रीस्वामी प्रसन्न हसती । नको करू रे खंत चित्तीं। अजाण करणें सुखी जगती। अतः करी मी चमत्कार ।। ६ ।। जन देखती चमत्कार । करिती निमिषात नमस्कार । सहज तेणें साधे सत्वर । जनकल्याण मार्ग मजसी ।।७।। जधी देखती मधुवाटिका । क्षणात धावती मधुमक्षिका । चमत्कार देखत एकएका । संसारी हो क्षणी सावध ।।८।। धाव घेती साधुपाठी। म्हणती हा तो हरी जगजेठी। थोर आमुची दैवगाठी । अतः लाभे विनायास ।।९।। नरासी ऐशा धरूनी करी । भक्ती मार्गी ने संसारी । शांत भाव फुलवित अंतरी । सहज साध्य हो मजसी ।।१०।। नराचा करणें नारायण । अतः कष्टती

रामकृष्ण। भक्त अंतर परिपूर्ण । शमले तदनंतरी ।।११।। चुरुनी कुपी जलसंगे । प्राशिती तथापि प्रत्यंगे । तुष्टवान् असती, नच लागे । वैद्य हकीम औषधी वा ।।१२।। जनसामान्यांसमक्षी । प्राशिती मदिरा पूर्णशिशी। परिमळ परी मुख कमळासी । अलौकिक हो चमत्कार ।। १३ ।। जरी असे भक्त मद्यपी । प्राशुनी मदिरा दे त्या कुपी । तत्पश्चात् भाविक कदापि । न स्पर्शी मदिरेसी ।।१४।। असता साधक निर्व्यसनी । दूरग्रामीं कधीं भोजनीं । अधिकारी सह मदिरासेवनी । नीतिभ्रष्ट होई ।। १५ ।। श्रीस्वामी अंतर्ज्ञानें । कष्टी होती भक्ताकारणें । पुसती त्याच्या सख्यालागुनी । कां की जाणावे त्याही ।।१६।। पश्चात्तापें तदनंतरी । भाविकभक्त सदा अंतरी । होई सावध निज संसारी । पदभ्रष्ट ना होई ।।१७।। विशाल निर्वात संदुकी । शयन करिती ते एकाकी । पश्चात् संदुकद्वारा झाकी । जन अवघे विस्मये ।।१८।। तीन दिवस स्वामी वसती। साधन सिद्ध स्थित अवस्थी । केंद्रित तदा सत्चित्शक्ती । देहकुडीचा नच निर्बंध ।।१९।। ध्यानावस्थीं ऋषीमुनींसी । अन्न न लागे ना उदकासी । प्राणवायुही हो उदासी । देह तयांचा शुष्क काष्ठ कीं ।। २०।। संदुकसाधन जनीं लौकिकीं । चमत्कार नव वाटे कवतुकीं । भक्तजनांची रीघ अवघी । देखण्या श्रीमहाराजांसी ।।२१।। एके समयीं गंगाधर शहाणे । भक्तासी श्रीमहाराज म्हणे । संदुकीत तूं संगे येणें । बंदिस्त राहती शिष्य गुरु ।। २२ ।। गंगाधरें कथिलें ग्रीष्म असोनी । शीतल अनुभुतीं दिव्य मन्मनीं । भान हरपलें कैसे वर्णुनी । शब्दांकित मी करणें ।। २३ ।। कुणा दाविती श्रीगायत्री । जगत्जननी अपूर्व शक्ती ।

रूपें देखिली ज्वाला ज्योती । भक्त ब्रह्मचारीनें ।। २४ ।। भक्त विनवी महाराजांसी । श्रीगायत्री मम नयनेसी। दावा कृपयें स्वामी मजसी । तळमळ लागे जीवा ।। २५ ।। अग्नीकुंडीं करिती समर्पण । ऊद धूप आणि चंदन। धूम्रे व्यापी दालन पूर्ण । भक्त देखे अग्नीज्योती ।।२६।। ज्योतरूप गायत्रीसी । जधीं देखिले प्रत्यक्षेसी। थरथर कापे प्रत्यंगेसी । भक्तराज भयविस्मित ।।२७।। काशीनाथ भोसले तनय । दिगंबर नामें सान वय । देहशुद्ध हरपुनी जाय । व्यथा विचित्र बालकांसी ।।२८।। डॉक्टर, हकीम, वैद्य कितीक । विविध आसवें देती गुटिक । रोगमुक्त ना होई बालक । स्वामींसी विनवी भक्त कोणी ।।२९।। श्रीस्वामी दिगंबरासी। जोजविती पर्यंकेसी । तेणें बाळप्रकृतीसी । आरोग्य जाहले पूर्ण ।। ३० ।। ऐसे दावुनी चमत्कार । भक्तांसी होई साक्षात्कार । प्रपंची गवसला परमार्थ सार । श्रीरामकृष्ण कृपयें ।।३१।। तयांचे शिष्य नामदेव । तेही खेळिले गुरु डाव । सिद्धि चमत्कार दावुनी सर्व । जनसामान्यां उद्धरिले ।।३२।। तयांची नसे जादुगिरी । पोटार्थी नसती, याचक द्वारी । तरण्या अज्ञानसंसारी । अवतरले सद्गुरु महाराज ।। ३३ ।। हंसक्षीरन्याय जाणावा । जादु, सिद्धी भेदभावा । रामकृष्ण महाराजदेवा । वंदिता क्षीर हो प्राप्त ।।३४।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३५ ।। इति अध्याय सातवा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। शिकवण ।।

अध्याय आठवा

श्रीगणेशाय नमः । 'यदा यदा ही धर्मस्य । ग्लानिर्भवति भारत । ते ते अवसरी भगवंत । भूवरी अवतरत । जाणती विश्वीं जन समस्त । धार्मिक अधार्मिकही ।।१।। अल्ला, येशू घननीळ । महावीर तैं बुद्ध कृपाळ । राजा, रंक कधीं गोपाळ । विविधरूपें अवतरले ।। २ ।। परमेशाची सगुण रूपें । मानवाची हरण्या पापें । सुखदुःखाची विविध मापें । नरदेहीं भोगिली ।।३।। तयांची परी अभागी बालकें । आपआपुली करिती कवतुके । सूकर, श्वान सारखे । अन्यत्रा मानिती, अवमानिती ।।४।। रामकृष्ण महाराज तथापि । समस्तां देखती ईश्वररूपी । अल्ला, येशू एकमापी । जाणती ते संतश्रेष्ठ ।।५।। इसाई असो वा मुसलमान । महाराजांसी सकळ समान । परमेशाचे रूप सान । भासे श्रीसद्गुरुसी ।। ६ ।। सय्यदबाबा रूपें ईश्वर । श्रींसी दावी साक्षात्कार । अल्लाघरचा संत थोर । सय्यद श्रींचा प्रथम गुरु ।।७।। अक्कलकोटीय स्वामी समर्थ । श्रींचे जीवन करिती सार्थ । गुरव बाबू नामें भक्त । दिव्य समर्थ

मार्ग दावी ।। ८ ।। काळोखाची अंधकवाडे । गुरु उघडती तेज नवे दे । साधक चेला डोंगरकडे । पार करी दृढ निश्चयें ।।९।। साधनकालीं भाव उमलती । देव देवता जागृत होती । पूर्णत्वाची साक्ष प्रचिती । साधक रामकृष्णा ये ।।१०।। रमजान पाळिती, जैसे कीं ते । जन्मजात मुसलमान भक्तसे । कष्ट शरीरा दे, उपवासे । न्यून न राही किंचिदपी ।।११।। जधीं करिती देवीउपासना । देवीवसनें आभूषणा । किरिट कुंडले, करीं कंकणा । लेविती माउली हो दुर्गा ।।१२।। तदाकार श्रीगुरु देखता । ठाके पुढती देवी समस्तां । वाटे सगुण साकार देवता । जगदंबा ती जगत्जननी ।। १३ ।। जो देखे त्या सद्भाव उमलती । सात्त्विक चित्तीं कमळें फुलती। प्रपंच चिंता विलया जाती । प्रेमानंद मात्र उरे ।। १४ ।। धर्मप्रसारक संत जणुं कीं । प्रीति उधळती भंवती लोकीं । आसक्ती ना परी लौकिकीं । साधु नामें मिरविणें ।।१५।। शत्रु होई मित्र निश्चित । भ्रातृभाव चित्तीं जागृत । विकल्प मनीं ना दूषित । सत्यवचन मम म्हणती ।।१६।। मानव अथवा पशू असो वा । बालक जिवलग असती देवा । मंगलकार्यीं नवसास्तव वा । अजासी ना द्या हो बळी ।।१७।। अजाण जन शिक्षित नसती । त्यांसी गुरु नव मार्ग दाविती । व्यसन पीडिता निर्व्यसनी करिती । मानवतेचे प्रचारक ।।१८।। कुणी दरिद्री

प्रपंच पीडित । अतः दोषी पापी रंजत । मठधामी हो अभ्यागत । दोषमुक्त हो तोंवरी ।।१९।। महाराजांचे मठाभीतरी । जो जाई त्यां वाटे अंतरी । मंगल पावन देवमंदिरी । निवसत श्रीमाउली ।।२०।। शतार्धाधिक काळही सरला । समाधीस्थ श्रीदेह निमाला । पूर भक्तीचा ना ओसरला । तथापि आजवरी ।।२१।। आत्मा सांडी देहकुडीसी । निगडित तरीही सुखदुःखाशी । सांवरीतसे प्रति भक्तासी । नतमस्तक होती म्हणुनी ।। २२।। हिंदु असो वा मुसलमानही । भक्ताचा श्री भार वाही । जधीं कुणी आर्त बाही । संकटसमयीं हें सत्य ।। २३ ।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।।२४।। इति अध्याय आठवा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। महानिर्वाण ।।

अध्याय नववा

श्रीगणेशाय नमः । 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' । तें गूज प्रिय शिष्यास । भगवंते कथिले धनंजयास । साधू जाणती थोर सान ।।१।। एक तप दोन उणें । वरुषें श्रीरामकृष्णें । जनकल्याणीं पूर्णपणें । व्यतिली सुखें अहर्निश ।।२।। ते जाणती निर्वाणसमया । उपदेशितां सकल शिष्या । असावा मनीं सुलभ उपाया । मज स्मरणें संकटीं ।।३।। जरी सांडीन देहकुडी । मज तुमची बहु आवडी । अतः राहुनी ब्रह्माण्डी । रक्षीन भक्तांसी निरंतर ।।४।। एकदा एका भाविक भक्ता । मजसी नाहीं रे देहममता । म्हणोनी तव पित्याची पक्षघाता । द्यावी मजसी म्हणे ।।५।। तेथोनी तीव्र यातना साही । औषधाविना गुरु राही । कणभरी आसक्ती ना देही । तडफडे प्राणज्योती कुडीं ।।६।। कायाबद्ध नित्यशुद्धा । चैतन्याची शक्ती देवता । देही उसळुनी शोधी वाटा । स्वस्वरूपी होण्या लीन ।।७।। दृश्य स्थूल देहालागी । सांडोनी जाणें निश्चित जगीं। म्हणोनी काष्ठ कुडीलागीं । स्थान पूनित दावी शिष्या ।।८।। राजकुळीं जन्म ज्यासी । सन्निध मी

तयापाशी । म्हणती सद्गुरू प्रिय भक्तांसी । गूज न जाणती अज्ञ ।। ९ ।। भूतभविष्य माउली जाणी । मृत्यु पदरव पडे श्रवणीं । नाकळे भक्तां श्रीगुरुवाणी । मायाबद्ध भक्त सकल ।।१०।। आंग्ल पंचांगी प्रथम मास। दिनांक दश पुण्यदिवस । वर्ष एकोणीसशे चाळीस । महाराज त्यजिती प्राण सुखें ।।११।। पौषमासीं शुद्ध प्रतिपदेसी । महाराज ब्रह्मीभूत होती । तथापि अभयवाणी प्रचीती । येई भक्तांसी आजवरी ।।१२।। श्री घेती अंतिम श्वास । सरला गुरु प्रियसहवास । अनाथ होती भक्त उदास । अनावर होई शोक ।।१३।। सरला जीवन महायज्ञ । हळहळती भक्त अज्ञ । गुरु आज्ञा म्हणती सुज्ञ । शिरोधार्य आम्हालागी ।।१४।। गुरुलागीं होते मान्य । तेंची स्थान सत्य धन्य । समाधि मंदिर शूचिपावन । उभारती शिष्य प्रेमें ।।१५।। दादर स्मशान भूमी पास । लाभे शांती सकलांस, । भक्त, तथा भाविकांस । संजीवन मंगल होई स्थान ।।१६।। चामराजेंद्र वडियार । म्हैसूर राजाधिराज थोर । तयाचा पुत्र मान्यवर । प्राण त्यागी मुंबापुरीं ।।१७।। सरबहादूर वडियार । देती धन भारंभार । म्हणती द्यावा भूसंभार । स्मशान समिती लागी ।।१८।। उभारती अलौकिक । मंदिर रूपें पुत्रस्मारक । कलाकृतीचें की कवतुक । साक्षात ठाके स्मशानीं ।।१९।। अंतरंग भक्त तया । गहनगूढ अर्थशब्दा । तथा रामकृष्णदेवता। महती जाणती सुस्पष्ट

।।२०।। चिरशांती घे राजवैभव । सन्निध गुरु शांति अनुभव । एकठायीं विराग वैभव । असारतेचा साक्षात्कार ।।२१।। ईश्वरासी राजा साधु । श्रेष्ठ कनिष्ठ नाहीं भेदु । समदृष्टी पाही समस्तु । अज्ञ पामर नेणती ।। २२।। स्मशान समिती मुखिया । महाराज भक्त शिष्यां । धिःकारिती करिती उपेक्षा। गुरुदेव समाधीची ।।२३।। तथापि सकल शिष्य भक्त । तथा नामदेव संत । पूजा अर्चनीं पूर्ण व्यतित । निज आयुष्य मनोभावें ।।२४।। वज्रेश्वरीवाडी मध्यें । नामदेव भक्त साधे । वसती, गुरु त्यां दे । निजकृपासाऊली ।।२५।। गुरुदेव दर्शनालागी । भक्त येती दिनराती । प्रकाशती असंख्य ज्योती । अंधारी जणुं सूर्यदर्शन ।। २६ ।। निर्जन, उदास, भयाण स्थान । कर्पूर परिमळें ये चैतन्य । नामदेव शिष्य सज्जन । पुण्यपावन करी वास्तु ।। २७।। भक्तें स्थापिले वालुकालिंग । पुजिती वाहुनी कुसुमें चांग । रंगावलीचे विविध रंग । नंदादीपही जळे अखंड ।। २८।। समाधिमंदिरी पूजा अर्चन । पार्श्वभागीं सागरगायन । भावभक्तीस ये उधाण । जनमनीं तथा सागरीं ।। २९ ।। मंत्रघोष व्यापी मंदिर । समुद्रलहरी गाती गंभीर । घंटानादें सायं अंतर । पावन विशुद्ध होई ।। ३० ।। स्मशान समिती सभासदांची । ना पर्वा ना तमा कुणासी । दृढ भक्ती दे भक्तजनांसी । अमाप अतुल धैर्य ।।३१।। सरले संवत्सर एक । संत्रस्त करिती

समिति लोक । धैर्य न सांडती भक्त भाविक । नामदेव, काशिबाई ।। ३२ ।। प्रथम पुण्यतिथी दिवशी । धनधान्याच्या येती राशी । भक्तजनांच्या उरी मानसीं । एकची ध्यास श्रीगुरुचा ।। ३३ ।। पूजाअर्चन महाप्रसाद । भक्त प्रवचना देती साद । भव्य सोहळा परमानंद । अवतरला कीं सात्त्विक भाव ।। ३४ ।। भासे भक्तां श्रीगुरुराणा । देती जनांसी आशीर्वचना । तुष्टती नामदेवाकारणा । धन्य सार्थ जीवन वाटे ।। ३५ ।। इति श्रीसद्‌गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३६ ।। इति अध्याय नववा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। शुभंभवतु ।।

।। श्रीनामदेव महाराज ।।

अध्याय दहावा

श्रीगणेशाय नमः । गुरु सांडी कुडी तथापि । जगदुद्धरण्या भक्तरूपी । भूमंडळा पूर्ण व्यापी । ज्योत उजळे ज्योती ।।१।। रामकृष्णदेही निमाले । भक्तजन भान हरपले । नामदेव शिष्य आगळे । अविचल तैं शांत ।।२।। द्वापारीं श्रीहृषीकेशी । पूर्णत्वें दे ज्ञानराशी । प्रिय शिष्य धनंजयासी । तैसे श्रीगुरुदेव करी ।।३।। उघडी अखिल ज्ञानदालने । सिद्धी देती बहु प्रीतीनें । म्हणती जपणें प्राणपणानें । अंतरंग शिष्यासी ।।४।। मानवतेला धर्म मानणें । परदुःखातें हृदीं जाणणें । सकल आपदा दूर सारणें । जगताचा हो सुखदाता ।।५।। गुरोर्राज्ञा शिरीं धरोनी । जनकल्याणा प्राण अर्पुनी। श्रीरामकृष्णगुरुचरणी । स्थिरावले नामदेव ।। ६ ।। त्यांचा धंदा टोपीयांचा । अमाप पैका प्राप्त साचा । तरी लागला गुरुरायाचा । छंद जिवासी अपार ।।७।। नामदेव ते धनिक जाहले । टोपीकलेमधी यशही लाभले । तेणें आप्त सौख्य पावले । नामदेव परी चिंता व्याकुळ ।।८।। ऐहिक

वैभव हो अशाश्वत । कीर्ति, पैसा दीर्घस्वप्नवत् । शाश्वत एकचि तत्त्व वाटत। ईश्वर तथा स्वधर्म ।। ९ ।। भक्तिभावसरिता स्रोतीं । अहर्निश भक्त पोहती । देहाची ना अल्प प्रीती । निःसंग, निर्मम जन्मजात ।।१०।। असार भासे गृहस्थ जीवन । अपत्यभार्या नच आकर्षण । विवाह वाटे भयाण बंधन । आप्तइष्ट ना जाणती ।। ११ ।। नेणती नामदेवा भाव । विवाह बोली काकाराव । करिती, देखुनी वधुस्वभाव । रूपसंपदा तैं पितयाची ।।१२।। भार्याकाका हो धनवंत । नामदेवांसी विनवीत। गृहदारा तैं अमाप दौलत । घ्यावी तुवां बा संतोषे ।।१३।। विद्या अविद्या ज्ञानमंदिरी । अथवा मायामोहसागरीं । लोभ मजसी ना व्यवहारीं । म्हणे नामदेव त्यांसी ।।१४।। त्यांचे ध्यान देवस्थानीं। जीव रमे नित ईशपूजनीं । सार्थ वाटे शान्त जीवनीं । एक ध्यास आमरणान्ती ।। १५ ।। वदतां तैसे हो अपमानित । व्यंकटकाका तैसे क्रोधित । विवाहबंध क्षणि अव्हेरित । राधा ना जा पतिगृही ।। १६ ।। नामदेवा खेद न खंत । ईश्वरेच्छा म्हणे समस्त । गृहदारासी त्यजुनी मस्त । रमले भगवत्चरणीं ।।१७।। परी अंतरी प्राण तळमळे । श्रीगुरुदर्शन विना नच कळे । अंधाराचे बंधन गळे । कैसे, कदा म्हणे ।।१८।। तळमळ, तगमग वृद्धि होता । गाणगापुरीं जावे आतां । ऐसे वाटे, जीवा

चिंता । पैसा परी ना पास ।।१९।। एकनाथ बंधुलागी । नामदेव आंस सांगी । यात्रा करणें, धनही मागी । एकनाथ हो क्रुद्ध ।। २०।। तीव्र कोपे बंधु म्हणती । धंदा उदीम विना जगतीं । कैंचा, कोण निवास करिती । भिक्षां देही ना भले ।।२१।। दुःखे नामदेव म्हणती । अगणित लोक यात्रा करिती । धनिक, भणंगही यात्रे जाती । जरी दृढ भाव मनीं ।। २२।। भाग्यवशें दो चरणांसी । ईश्वर देई प्रति मनुजासी । भेटण्या श्रीदत्तगुरुसी । करणें पदयात्रा ।। २३ ।। गाणगापूर तीर्थक्षेत्रा । करुनी जावे कीं पदयात्रा । पदकमलांहुनी थोर पवित्र । वाहन दुजें ना जगीं ।। २४।। घेती न संगे वस्त्रप्रावरण । अथवा दौलत की तंदुलकण । वाटेमाजीं देव लेकरें पण । देती प्रेमे अन्ननिवारा ।।२५।। यात्रेमाजी बहुमोलाचे । ज्ञान गवसले तयासी साचे । दारिद्र्यामधी बंधुत्वाचे । दिव्य बंध असती ।। २६ ।। गाणगापुरीं कुणी शेतकरी । नेई त्यांसी देवमंदिरी । जणुं देवता चमत्कार करी । शेतकरी हो अदृश्य ।। २७।। नामदेवा होई दर्शन । मंदिरी बैसे श्रीनारायण । ग्रामीही देई भक्ता दर्शन । विविध रूपदेहीं ।। २८ ।। भान हरपुनी देखे देवा । जीवन सार्थक नामदेवा । झाले वाटे ईशसेवा । सफल होई तदा ।।२९।। बाल्यात होता छंद आगळा। अनिमिष बघणें देव विठ्ठला । पूजेचा ही दिव्य सोहळा । करणे देह विसरूनी ।। ३० ।। परी

अंतरी होई तगमग । झाली नामदेवांसी मग । देहरूपी सद्‌गुरु चांग । भेटावा वाटे मनीं ।। ३१ ।। अतः सद्‌गुरु धुंडिती शोधिती । गेले भक्त अक्कलकोटीं । प्रातःकाळी एक शुभघटी । नामदेवा हो दृष्टान्त ।। ३२ ।। मुंबापुरी गुरु वाट पाहती । सोडी आतां तूं भटकंती । मुंबापुरी तव सद्‌गुरु भेटी । पुण्यमयी रे होईल ।। ३३ ।। श्रवणीं पडतां मंगलवाणी । नामदेव अंत:करणी । हृदयस्थ श्रीसद्‌गुरु चरणीं । मस्तक ठेवी भावभक्तीनें ।। ३४ ।। इति श्रीसद्‌गुरु चरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३५ ।। इति अध्याय दहावा समाप्त ।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। सर्वे सुखिनः ।।

अध्याय अकरावा

श्रीगणेशाय नमः । अक्कलकोटीं पडे श्रवणीं । स्वामीसमर्थ श्री वाणी । मुंबापुरीस जा झणीं । धुंद जाहले महाराज ।।१।। आनंदाने धुंद जाहले । बेहोषीच्या लहरी उसळे । अनुपम सौख्यें मना व्यापिलें । कृतार्थ होती नामदेव ।। २ ।। परी परततां मुंबापुरीसी । कसे धुंडणें श्रीगुरुसी । चिंतेनें मनीं कासाविशी। तुफान हो उठले ।। ३।। अवचित हृदयीं भावभक्तीची । वीज चमकली कीं तेजाची । असतां इच्छा गुरुरायाची । सफल कामना होई ।।४।। नामदेव परतुनी येतां । अनुज बंधु एकनाथा । वाटे भेटूं वडीलताता । आनंदे होई भ्रात्रभेटी ।।५।। फकीरशेट गृहीं स्वामी । निवसत तदा सेवाधर्मी । अन्नदान समजुनी नामी । सुखेनैव समाधानीं ।। ६ ।। स्वामीमठीं एकनाथ । जाती नित्य होती शांत । देवदेवता हार अद्‌भुत । सुगंध मठीं दरवळे ।।७।। पवित्र मंगल वातावरणीं । मठ लागे त्यां भवभयहारिणी । रामकृष्णगुरु पावन चरणीं । साक्षी दिसे भगवंताची ।।८।। एकनाथ विनवी अग्रजा । दर्शनासी चल श्रीमहाराजा । अक्कलकोटिय समर्थराजा । गुरू रामकृष्णांचे ।।९।। रामकृष्ण गुरु नाम

ऐकतां । हृदयीं स्रवली अमृतसरिता । गुरुप्रीतीची साक्षही पटतां । भक्त हरपले गुरुपदीं ।।१०।। अति उत्कंठा अतीव भक्ती । नामदेव जा बंधुसहिती । रामकृष्ण महाराज मठीं । हृदयीं उसळे कल्लोळ ।।११।। परी पहा हो विपरित घडले । रामकृष्णें दर्शन न दिलें । नामदेव परी विकल न झाले । वाटे स्वामी घेती कसोटी ।।१२।। दुजिया दिनीं जातां परतुनी । प्रसन्न वदने स्वामी देखुनी । नामदेव जा लोटांगणी । कृतार्थ होती क्षणीं ।।१३।। सद्गुरुराजा निजशिष्यासी । देती दीक्षा दृढ श्रद्धेची । कठोर तैसी उपासनेची । गुरुचरित्ररूपें ।।१४।। सद्गुरुराणा आज्ञा करिती । गुरुचरित्र सप्ताहाची । करी बा शिष्या, चरित्राची । पारायणें सात ।।१५।। वाचनसमयीं अन्न न भक्षी। गोरस अल्प केवल प्राशी । कठोर आज्ञा करी शिष्यासी । रामकृष्ण गुरुदेव ।।१६।। दिव्यत्वाचा मार्ग खडतर । देता प्रसाद श्रीसद्गुरुवर । शिष्या होई साक्षात्कार । गुरुकृपेचा धरा भरवंसा ।।१७।। एकोणीसशें चौतीस साली । गुरुशिष्याची भेट जहाली । अंधारी श्री ज्योत उजळी । करण्या नामदेवा धन्य ।।१८।। तदनंतर गुरु घडवी अविरत । भाग्यशालिनी शिष्य मूरत । कांक्षा मनीची पूर्ण सदोदित । होती सत्शिष्याची ।। १९।। मार्ग दाविती सुख शांतीचा । दिव्यत्वाचा चिरंतनाचा । अनुभव देती अद्वैताचा । सद्गुरू सत्शिष्यासी ।।२०।। अपार सामर्थ्याचा ठेवा । लाभे तदा नामदेवा । स्मशानसमितीचा हेवा । साही म्हणुनी ते ।। २१।।

स्मशानसमिति सभापतीनें । जनें अर्पिली समाधीसुमनें । उधळली क्रोधें अभद्रवचनें । पादत्राणें तुडविली पश्चात् ।। २२।। बंद करोनी कवाड तैसा । मंदिरवाटा करी बंदसा । वाटे त्यासी पूजाअर्चा । निश्चित होई बंद ।। २३ ।। भक्त तथापि हरहुन्नरी । पाठी त्यांच्या कृष्णमुरारी । चढुनी भिंती पार करी । पूजा करिती समयोचित ।।२४।। कधी एकदां नामा भक्त । शवयात्रेसह भीतरी जात । धुंद साधनीं होते मात्र । कठिण काष्ठें मारी सेवक ।। २५ ।। रत्नाकर नामें भक्त । ध्यानसाधनीं 'अहं' नष्ट । दृष्टि देखतां होती क्रुद्ध । अधिकारी एक ।। २६ ।। थप्पड श्रीमुखीं देई । उघडी नयनें भाविक पाही । दुज्या कपोलीं परतुनीं मारी । अविचारी अधिकारी ।। २७।। भंग होई ध्यानावस्था । क्रोधें कापे, तप्त माथा। अधिकारी मुखी थप्पड देता । रत्नाकर हो शांत ।। २८ ।। एके समयीं स्मशानदरवान । नैवेद्याचे ताट पावन । देई उधळून फाडी वसन । नामदेव भक्ताचे ।। २९।। ढळली नाहीं कणभर शान्ती । समीप ठाके तटस्थ मूर्ती। संत नामदेव गुरुची । स्थितप्रज्ञ ते महान् ।। ३० ।। तद्नंतर श्रीनामदेवें । त्यजिली वसनें पूर्णत्वानें । दत्तदिगंबररूपे राहे । आमरणान्तरी ।। ३१ ।। समस्त भक्त, काशीबाई । अतीव लढले भक्तीपायीं । अंती मिळे न्यायालयी । यशदान त्यांसी ।। ३२।। समाधीवरी करण्या अर्चन । न्यायदेवता दे अनुमोदन । तेणें भाविक प्रेमें न्हाऊन । येती दिनराती ।। ३३ ।। तथापि समिति प्रमुख । एके दिनीं ये

अचानक । आज्ञा होता त्याचे सेवक । करिती भंग पादुकांचा ।।३४।। काशीबाई नामें भाविक । भक्त दुजी अति सात्त्विक । तिसी होई अपार दुःख । पादुकाभंग होता ।। ३५ ।। अंती सुष्ट दुष्टांचा । सरला लढा संकटांचा । अंत झाला समितीचा । भगवंत कृपये ।। ३६ ।। पुनश्च स्थापिल्या श्रीपादुका । समीप ठाके प्रतिमा एक । मंदिर उभे लावण्यरेख । मिरवित निमंत्रित जना ।। ३७ ।। विद्युत् ज्योती उजळती । मंदिरासी प्रकाश देती । तेजाळली पितृभक्ती । आडवणकरबंधूंची ।। ३८।। सत्य असत्याचा लढा । भक्ती अभक्तीचा तेढा । युगायुगांतरी वेडा । संग्राम चाले अहर्निशीं ।। ३९।। जरी यशप्राप्ती व्हावी । गुरुचरणीं धाव घ्यावी । पादपद्मीं समर्पावी । दृढ सेवा निरंतर ।।४०।। सद्गुरुसारिखा नसे अन्य । त्राता जगीं सत्य मान्य । अनन्यभावें जावें शरण । म्हणोनि सकल भाविक हो ।।४१।। रामकृष्णें, नामदेवें । तारियले जन अवघे । म्हणोनी श्रीमंदिरी जावें । दिनरात जन हो ।। ४२ ।। काशीबाई संत थोर । तिचा हस्त माथ्यावर । सहज होणें भवपार । तेणें भाविक हो ।। ४३ ।। इति श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।।४४।। इति अध्याय अकरावा समाप्त ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

।। श्रीरामकृष्ण महाराज चरणीं अर्पण ।।

।। शुभंभवतु ।।

।। काशीमाउली ।।

अध्याय बारावा

श्रीगणेशाय नमः । ज्योतीनें उजळें ज्योत । जाणताती भाग्यवंत । तथा श्रेष्ठ साधुसंत । करिताती उपकार ।।१।। जडदेहीं साधुवर । दूर सारी अंधःकार । प्रकाशती भवसंसार । अजाण दृढ भक्तांचे ।। २।। जे भक्त सन्निध येती । तयांचे सद्भाग्य उदेती । सुवर्णरूप सर्वां देती । साधुसंत सद्गुरु ।। ३।। श्रीरामकृष्ण सद्गुरूनीं । उद्धरले नामदेव जीवनीं । नामदेवे गुरुभगिनी । काशीबाई उद्धरली ।।४।। रामकृष्ण एक दल । नामदेव दुजा कृपाळ । काशीबाई तृतीय दळ । बिल्वपत्र हे साकारले ।।५।। त्रिदलपर्णें विविध भक्तां । सिंचुनी जल ज्ञानामृता । पावन केले, धरिले हातां । भवसागर तरले सर्व ।।६।। राजापूर तालुक्यात । भू तेरवण नगरात । एकोणीसशे एक संवत्सरात । काशीबाई जन्मली ।।७।। बाबी अपंडकर ते पिता । उमाबाई नामक माता । हरी नामें अग्रज भ्राता । तीन भगिनी अन्य ।।८।। प्रपितामह त्यांचे धनिक । दैन्यावस्थी परी जनक । पेंढारी लुटती अचानक । प्रपितामह वैभव ।। ९ ।। पेंढारी लुटण्या येती ग्रामी । पितामहे संपदा लक्ष्मी । कूपीं टाकिली युक्ती नामी । करूनी विचार अविलंबे ।।१०।। कूपमुखावरी तदनंतरी । उभारली सुरम्य मंजिरी । तुळशी वृंदावनांतरी । पवित्र शुभद एक ।।११।। भक्तिभावें पूजा करणें।

तुलसी प्रदक्षिणा घालणें । मंगल ऐसे जीवन जगणें । होई बाल काशीबाईंचे ।।१२।। बाल्यावस्थीं काशीबाई। बहुत हट्टी आततांई। प्रिय तरी अंती होई । बंधु हरिभाऊंसी ।।१३।। हरिभाऊ मुंबापुरी । करीती सुखेन एक चाकरी । जाई जरी रत्नागिरी । आप्त स्वकीय कोणी ।। १४ ।। देई खाऊ वसने तथा । भगिनीस्तव त्यांची ममता । परी निश्चयें म्हणे दाता । देणें सख्या काशी हातीं ।।१५।। काशीविना अन्यासी जरी । देई विचूक गावकरी । अपमानित काशी भारी । संतत रडे अखंडित ।।१६।। कोणी प्रौढा म्हणे तदा । काशीबाई गे तूं राजा । रडुनी रक्षिसी राज्यपदा । स्वकीय कुटुंबियांचे ।।१७।। राज्ञीपदा भूषविले । काशीनें परी भिन्न आगळे । अष्टादश वरुषें भले । भक्त हृदयांवरी ।। १८ ।। बाल्यीं देहा किती झिजविले । अपरंपार कष्ट साहिले । अन्नाविना दिवस लोटले । धडे गिरविले सोशिकतेचे ।।१९।। कांजी पेज कधीतरी । पालाभाजी पोट भरी । बाल्य सरले उपासमारी। समस्त भगिनींचे ।।२०।। मातेसंगे काष्ठें, पर्णें। अथवा तृणभार वाहणें । रानीवनीं दिनभर जाणे । काशीजीवन ऐसे हो ।। २१ ।। रानीवनीं मार्गी काटे । रुतती, परी अश्रु पुसते । एरंडाचा चीक घोटते । काशीताई चिमणी ।। २२ ।। एरंडाचा तरू जसा कीं । निजरसलेपा करी सार्थकी । काशी लागी अचुक औषधी । देई प्रेमभरे तो ।। २३ ।। देवमंदिरी हरिदासही । हरिनामाची देई ग्वाही । जन्मभरी हरीगुण गाई । म्हणोनी काशीमाउली ।।२४।। नामशक्तीनें काशी तरली । जैसी विठ्ठल धरी साऊली । सखु, जनाईवरी आपुली । रामकृष्णमहाराज करी ।। २५ ।। हरीभाऊनें पति नेमिला ।

नाभिकचाकर कुणा दुर्बला । शरीर स्वास्थ्य नसे त्याजला । ज्ञात न कोणा परी ।। २६ ।। हरिश्चंद्र चव्हाण नामक । होता तो तरुण भाविक । काशीबाई युवती सात्त्विक । नियतीची लीला दुर्गम ।। २७।। काशी सासू कजाग भारी । पुत्रवधूसी कष्ट अपारी । दुःखे व्याकूळ हो संसारी । काशीबाई बाला तेणें ।। २८ ।। धनदौलतही थोडी थोडी । म्हणुनी जीवा लागे ओढी । ईश्वरचरणीं लागे गोडी । काशीबाई माउलीची ।। २९ ।। दुराग्रही काशीबाई । अकस्मात शांत होई । देवकृपेस्तव तगमग होई । भवसागरी काशीईची ।। ३० ।। शरीरस्वास्थ्य पतिसी नाहीं । अर्थोत्पादन अल्पची होई । कठोरमूर्ती सासूबाई । ध्यान लागले गुरुपदीं ।। ३१।। गुरुविना ना अन्य त्राता। मनःशांतीचा तोची दाता । भेटवी देवा गुरुदेवता । धावा करी काशीबाई ।।३२।। नित्य जाती बंधु हरी । भेटण्या श्रीस्वामी कुटिरी । रामकृष्णरूपें श्रीहरी । प्रभादेवी स्थानीं ।।३३।। संत थोर श्रीरामकृष्णगुरु । दुर्बल दलितांचे श्रीसद्‌गुरु । काशीबाईसी आधारू । होती ईश्वरकृपेयें ।।३४।। होता कृपा श्रीसद्‌गुरुची । दूर जाहली व्यथा काशीची । फुलली बाग अंतर्मनीची । दरवळले जीवनतदा ।। ३५ ।। कृपा परिमळें माउलीच्या। सुलभ वाटा भक्त जनांच्या । समीप जाती भगवंताच्या । कितीक भाविक भक्त ।। ३६ ।। म्हणोनी श्रीसद्‌गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३७।। इति अध्याय बारावा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। भवसागर ।।
अध्याय तेरावा

श्रीगणेशाय नमः । संसार होई सुखाचा । लेश नुरे दुःखाचा । प्रसाद लाभता गुरूचा म्हणोनी धरावे गुरुपदरा ।।१।। हरिभाऊ नित्य जाती । माता उमा त्या सांगाती । तथा भागू भगिनी ती । रामकृष्णमंदिरी ।। २।। श्रीदत्तगुरुदिनीं एके । संगे काशी जा भाविक । निरसण्या सकल सुखदुःख । श्रीमहाराजचरणीं ।। ३ ।। मठीं देखिले शुभासन । वरी विराजे छबीतून । स्वामीसमर्थ पुण्यपावन । पुष्पें भूषवी छबीसी ।। ४ ।। भंवती कुसुमे सुगंधित । सामोरी उजळे समईज्योत । भावविव्हल हो हृदयांत । काशीबाई तदा ।। ५ ।। तथापि 'अहं' काढी फणा । जननी जाई लोटांगणा । छबिसी नमणें ये न मना । काशीबाई माउलीच्या ।। ६ ।। समीप एका अन्य दालनीं । होते श्रीरामकृष्णमुनी । दिव्यत्वा त्या अवलोकुनी । नतमस्तक हो काशीमाई ।। ७ ।। काशीसी श्रीमहाराज म्हणाले । बाळे, तव मी कष्ट जाणिले । वीस अधिक एक गुरुवार भले । व्रत आचरी नियमें ।। ८ ।। नैवेद्यासी दत्तचरणीं । खडीसाखऱ्या अर्पण करुनी । तीन समान वाटे करुनी । एक देई गोमातेसी ।। ९।।

दुजा देई सारमेया । तिसरा अवशेष तुझिया । कारणें गे भक्षावया । अरिष्ट तव हो दुरी ।। १० ।। निराहारी राही तदा । न प्राशी थेंब उदका । आचरी ऐशा कठोर व्रता । कल्याणकारी तुजलागी ।। ११ ।। वंदोनी श्रीगुरुचरणा । काशी म्हणे सद्‌गुरुराणा । राखीन तव शब्दवचना । निश्चित जाणा देवा ।। १२ ।। क्षणीं म्हणे उमा माता । देखावी ही दुजिया दुहिता । बृहस्पतिदिन हो दुश्चिना । धाल्याकन्येसी मम ।।१३।। हिजसी होती पुत्र कन्या । तदा अपार हो यातना । उपाय कैसा ह्यासी करण्या । वदावे सद्‌गुरुस्वामी ।।१४।। रामकृष्णमहाराज वदले । रौप्य ताईत द्यावा धाल्यें । जननीनें उपाय केले । तथापि घडले विपरीत ।। १५ ।। प्रसुतसमयीं कन्या धाल्या । बहुत यातना कष्ट साहिल्या । अंती अर्भका सोडोनिया । निजधामासी पातली ।।१६।। द्वितीय दिनीं तान्ही बालिका । सोडुनिया इह मृत्युलोका । जाई लगबग देवलोका । भेटण्या कीं मातेला ।।१७।। परंतु काशीबाईलागी। गुरुकृपा लाधे वेगी । तियेची निष्काम तपी । वृत्ति जाणती सद्‌गुरुस्वामी ।।१८।। काशी नित्य मठीं जाई । सकल रूपें सेवा करी । क्षुद्र अथवा हीन न मानी । प्रति कर्म श्रेष्ठ तिजसी ।।१९।। मठसेवा कर्म यज्ञ । ऐसे जाणी काशी सुज्ञ । भाव तियेचा पवित्र शुद्ध । गुरुदेव जाणती ।।२०।। विशुद्ध बुद्धि, मन निर्मळ । समस्तां प्रती भक्ति प्रेमळ । जाणोनी

तुष्टति गुरु कृपाळ । अविरत कृपा वृष्टि करिती ।।२१।। बृहस्पतिदिनीं भगिनी अंत । होतां काशी हो विचलित । तृतीय वारी ऐसे अघटित । कैसे घडे ना कळे ।। २२।। दुःखे काशी तया दुर्दिनीं । गुरुदर्शना ना जाणोनी । जाती सद्गुरु रात्रीं स्वप्नीं । भेटती भक्तवत्सल गुरु ।। २३ ।। पुसती का न येसी बाळे । डळमळतो कीं निश्चय नकळे । पतिस्वास्थ्य ना तुजसी मिळे । अतः होसी का कष्टी ।।२४।। तदा काशी पूर्ण उमगली । आशा हृदयीं कीं पालवली । तैसी श्रद्धा द्विगुणित झाली । सद्गुरुदेवचरणीं ।।२५।। एके दिनीं श्रीरामकृष्ण । बैसले मठीं विचित्र ध्यान । घंगाळी ठेवूनी समचरण । करांतरी पळी सान ।।२६।। खांद्यावरी एक कांबळी । देहावरी कौपीन आगळी । त्यावीण ना अन्य वस्त्र मुळी । ऐसे ध्यान, ऐसी स्थिती ।। २७।। धावधावती दर्शनास । लागे उमाईसी ध्यास । निरोप जाई काशीईस । दर्शनासी येई त्वरें ।।२८।। अवलोकिता काशीईसी । कुणी जाणिले हो नियतीसी । भाळी रेखिले वैधव्यासी । अस्फुट वदले स्वामी ।। २९ ।। वय सान, कष्ट भारी । गुरुवाणी वज्रधारी । अवचित पडतां कानावरी । काशी थिजली करुणामूर्ति ।।३०।। निश्चल सद्गुरु तदा वदले । जळीं टाकी तूं पैसा बाळे । पश्चात् तेंची तीर्थ दिधले ।प्राशिले तियेनें भक्तीनें ।।३१।। दत्तगुरुदिन एकवीस । सरले सकल व्रतउपवास। गुरुसेवेचा लागे

ध्यास । संसार वाटे अपूर्ण ।।३२।। पुत्र अपत्य होता प्राप्ती । गुरुसन्निध करणें वसती । काशी मनीं ध्यास सतती । लागला अलौकिक ।।३३।। मठासमीप जीर्ण झोपडी । उभी देखिली एक एकटी । धनी तियेचे फकीरशेटजी । आशा पालवली मनीं ।। ३४ ।। धैर्य धरोनी जाई काशी । फकिरापाशीं एके दिवशी । विनम्र वदली द्या हो मजसी । कुटी आपुली शेटजी ।। ३५ ।। शुल्क चार रौप्य मुद्रा । म्हणता तुष्ट काशी भद्रा । उजळली क्षणीं काशी मुद्रा । गुरुदर्शन नित होईल म्हणे ।। ३६ ।। दुजिया दिनीं नूतन गृहीं । निज कर्तव्यें करुनी पुरी । भूषविले मठ अंगण द्वारी । करोनी सडासंमार्जन सुंदर ।। ३७ ।। माध्यान्ही श्रीमहाराजगुरु । अवलोकिती मठ परिसरु । निर्मळ साज शुद्ध सुंदरू । प्रसन्न चित्त होती ।। ३८ ।। धन्य धन्य काशीबाई । अकस्मात श्री वदती । शुचित्वें ते आनंदती । सार्थ जीवन हो तियेचे ।। ३९ ।। म्हणोनि श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।।४०।। इति अध्याय तेरावा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। संन्यस्त काशीबाई ।।

अध्याय चौदावा

श्रीगणेशाय नमः । ईशकृपा होता मनुजा । लाधती सद्‌गुरुचरणांबुजा । भवपार होणें सहज । तेणें तयासी सुलभ ।। १।। वैशाखमासीं शीतलोदका । जीवनीं तैसे गुरुपादुका । अहर्निश आनंददायक । सहजी हरती सकल कष्ट ।। २ ।। प्रपंची करी पतिसेवा । परमार्थीं आळवी गुरुदेवा । काशीसी ना मोहलोभ वा । निष्काम करी ती कर्म ।। ३।। मठ सामोरी कुटी तियेची । अतः जाणोनी व्यवहारासी । गुरुकारणीं निज देहासी । झिजवी ती दिनरात ।।४।। सदा सर्वदा योग घडावा । गुरुकारणीं देह झिजावा । तळमळ एक तिचीया जीवा । सफल कांक्षा हो मनींची ।।५।। भासे प्रसन्न काशीआनन । विचलित परी अंतःकरण । अंतरी जळे गुरुवचन । वैधव्य भाळी रेखाटिले ।। ६ ।। कधी वाटे गुरुमाउली । संरक्षिते प्रति पाऊली । नियतीची गहन कृष्ण सावली । सारील सद्‌गुरुराणा ।।७।। परी घडले जे अटळ । मार्गशीर्ष षष्ठी काल । कोसळले काशीवर आभाळ । दुर्दैव गाठी परिसीमा ।।८।। तियेची भगिनी भागूबाई । स्वकीय सदनी ने काशीई । फकिरासी परतुनी कुटि देई । काशी हो निर्मम निःसंग ।। ९।। अभागिनी काशी अवस्था । ठाव

घेई महाराज चित्ता । भोजन धाडिती नैवेद्य ताटा । कळवळले श्री अंतरी ।।१०।। भागूबाई भगिनी रंक । महाराजांसी हो ठाऊक । तैसे जाणती निष्ठा सात्त्विक । काशीबाई साध्वीची ।।११।। एके दिनीं पाचारोनी। काशीसी वदले गुरुमुनी । आजपासोनी मठसदनी । वसती करी गे बाळे ।।१२।। मठाश्रमासी जाणी बाई । गृहसमान काशीबाई । सुखेनैव येथ राही । श्रीसमर्थस्वामीं चरणी ।।१३।। अक्कलकोटिय स्वामीसमर्थ । अन्ननिवारा देण्या समर्थ । जाणावे त्वां पूर्ण यथार्थ । स्वामीसद्गुरु शक्ती गे ।।१४।। सरली चिंता नुरली व्यथा । काशी होई स्वस्थ चित्ता । रमली सेवाधर्म राखता । किंचित् काळ येणेंपरी ।। १५ ।। परमार्थ परी पूर्णतया । हातीं गवसे ना तिचिया । पाश चिमुकला संसारी ह्या । ओढी वरचेवरी ।। १६ ।। अनिर्बंध ना होते जीवन । पति प्रतिमा कीं सान लहान । अपत्य रूपें ओढी प्राण । संसारी अविरत तिजसी ।।१७।। निरपेक्ष ना सेवा घडते । खंत ऐसी चित्ता होते । अतः गुरुदेवासी प्रार्थिते । दृढभाव असो त्वचरणीं ।। १८ ।। परमार्थी जया आवडी । भगवंत तया पार करी । पाशबंध नुरे संसारी । अनासक्त हो नर ।।१९।। अष्टवरुषें होता पूर्ण । काशीपुत्र आयु अपूर्ण । देवलोकीं करी प्रयाण । वज्राघात मातेवरी ।। २० ।। सद्गुरु तथा मठनिवासी । करिती शांतवन मातेसी । जया जन्म, मृत्यु त्यासी ।

म्हणती अटळ मनुजासी ।।२१।। राव रंक पशुपक्षी । मरण न टळे हो एकासी । सानिध्य गुरुचे काशीईसी। सद्‌भाग्य तियेचे म्हणती ।। २२।। गुरु बाहती काशीईसी । मम कार्यीं गे तव देहासी । समर्पावें त्वां प्रति दिवशी । स्थितप्रज्ञ होई जगीं ।। २३ ।। मम वसनें, आसन, गादी । प्रक्षाळिता हो पापशुद्धी । सेवाधर्मीं स्थिर करी बुद्धि । तूं गे बाळे निश्चित ।।२४।। पूजा अर्चन सांज सवेरी । समई लावी देवमंदिरी । झिजवी काया चंदनापरी । नरजन्मासी करी सार्थ ।। २५ ।। संन्यासिनीसम आयु सारणें । धनलक्ष्मीचा लोभ न धरणें । किंचिदपी ना संचय करणें । कठोर व्रत आचरी ।। २६ ।। पास होते सात पैसे । स्वामीसमर्थचरणांशी । अर्पुनी निःसंग हो काशी । गुरु आज्ञा प्रमाण ।।२७।। एक भावें करी सेवा । एक तप अधिक सहा । वरुषें सरतां श्रीगुरुदेवा । प्रसन्न होती काशीवरी ।। २८ ।। पुण्यसंचय अयाचित । घडला तिजसी अकस्मात । नारी जन्म सार्थ होत । काशी माउलीचा ।। २९।। मठ होई तिज निवारा । सद्‌गुरुचरणीं दृढ आसरा । न लगे तिजला आप्त सोयरा । गुरुबंधु होती तिजसी आप्त ।।३०।। तीस वरुषें तपे मठी निवास । गुरुभक्तांचा शुभ सहवास । सहजची प्राप्त काशीईस । वाचासिद्धी ये आपैपी ।।३१ ।। अंत होता श्रीदेवांचा । अधिकार तिजसी अधिपतीचा । नामदेव महाराजांचा । सहजची प्राप्त तिजसी

।।३२।। तये समयीं काशी माउली । नामदेव गुरुसाऊली । दुर्बलांसी प्रति पाऊली । संरक्षी बहु प्रेमें ।। ३३ ।। नामदेव त्यजी इहलोका । काशी उरली हो एकैका । सारिण्या दूर मानवदुःखा । झगडली माउली ।। ३४ ।। जधीं कोणी दुःखपीडित । धाव घेई राऊळात । करी तया ती पीडामुक्त । ध्यात श्री चरणांसी ।।३५।। हाक घाली गुरुदेवांसी । 'स्व'त्व अर्पी गुरुचरणांशी । तदा होई एकरूपशी । भक्तभवभयहारी ।। ३६।। रामकृष्ण नाम जपणें । ध्यान साधनीं गुंगुनी जाणे । तदा तियेचे ऐसे जगणे । ना स्वार्थ ना अर्थ याविना ।। ३७ ।। सहस्त्र नारी जन्मती मरती । सुखदुःखाचा खेळ खेळती । मायाजालीं रमती गमती । नांव न उरते त्यांचे ।। ३८।। नियतीच्या परी सारिपटावर । अजिंक्य होई काशी पामर । अर्पुनी 'अहं' श्रीचरणांवर । अजरामर होई ।। ३९।। म्हणोनी श्रीसद्गुरुचरणीं । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ४० ।। इति अध्याय चवदावा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। शुभंभवतु ।।

।। आप्पाराव ।।

अध्याय पंधरावा

श्रीगणेशाय नमः । नर होई नारायण । करितां अपूर्व ध्यानसाधन । हें तो असे सत्यवचन । साधुसंत करिती सिद्ध ।।१।। प्रपंची परी मायाबीज । उदकीं जैसे कीं पंकज । नीतळ-निर्मळ भासे सहज । सुरम्य नील जलावरी ।। २।। कमलतंतु परी कोमल । करी बंदिस्त जळीं कमळ । मनुजमुद्रा तैसी सरळ । उदास तरी व्याकुळ चित्तीं ।।३।। काशीबाई संन्यस्त विरक्त । सेवाधर्मी धुंदरत । पुत्रशोके व्यस्त त्रस्त । दिनरात अंतरी ।।४।। बाईंची ती व्याकुळता । स्पर्शी नामदेव चित्ता । अपत्यविना जगीं माता । असहाय दुर्बल ।। ५।। अतः एके दिनीं वदले । काशीबाई अभागी बाले । पुत्र तुजसी प्राप्त प्रेमले । निश्चित अविलंबे जाण ।। ६ ।। नामदेव गुरुवाणी । पडतां सकल भक्त श्रवणीं । विस्मित समस्त होत तत्क्षणीं । गुरुवचन हो परी सत्य ।।७।। उपनाम जगदाळे नामक । आप्पाराव भक्त एक । भाविक, सात्त्विक परी कफल्लक । समाधीमंदिरी येई।।८।। आप्पासखा फुलसुंदर । बघुनी

जीवन अति कठोर । आप्पालागी म्हणती ईश्वर । आधार मनुजासी बा ।। ९ ।। नामजपासी स्वीकारणें । श्रीहरी दिव्य हृदीं देखणें । सौख्य्य सहज सुलभ होणें । भाग्यवंताशी सखया ।। १० ।। नित्य रामकृष्ण नाम । जप रे सख्या हो निर्मम । भक्त कामकल्पद्रुम । वरदायक होईल बा ।।११।। तत्पश्चात् आप्पाराव । अहर्निश जपती नाम । सरले सुखेन दिवस दशम । स्वप्न देखती अभिनव ।।१२।। जटाधारी शुभलक्षणी । दिसे मानव विचित्र कोणी । दृष्टान्ती त्यां वदे स्वप्नीं । अनुचरावे मज, मी पुजारी ।।१३।। मार्गीं गहन अंधःकारी । पशुपक्षी ना पादचारी । नसे परंतु एक मंदिरी । स्थिरावती दोघे ।। १४ ।। जटाधारी हो अंतर्धान । आप्पा होती सावधान । दृष्टान्ताचा अर्थ महान् । कथिती फुलसुंदर त्यांसी ।। १५ ।। रामकृष्णमहाराज भक्तां । दृष्टान्तरुपें कितीकदा । अचूक गवसे वाट बहुदा । समाधिमंदिराची ।। १६ ।। एके दिनीं वाटेवरी । आप्पा होती विस्मित भारी । देखती मार्गी दत्तमंदिर । स्वप्नीं देखिलें जैसे कीं।।१७।। तदनंतरी दत्तवारी । आप्पा जाती दत्तमंदिरी । अर्पिती स्निग्ध तथा साखरी । श्रीगुरुदत्तपदीं ।। १८ ।। दत्तात्रेय नामस्मरणीं । अविरत रमती ध्यानीं मनीं । श्रीगुरुगीता पठण करोनी । गुरुदेवांसी प्रार्थिती ।। १९।। पुण्यसंचय सत्कर्मांचा । पावन हो

कण देहमनाचा । हृदयीं सडा हो कुसुमांचा । परिमळ दरवळे भंवती ।।२०।। पश्चात् लागे ओढ जीवा। सद्गुरु श्रेष्ठ कीं भेटावा । फुलसुंदरासी म्हणे भावा । नेई मजसी श्रीपादपद्मीं ।। २१ ।। सखा म्हणे आप्पाराव । मद्गुरु असती नामदेव । जरी तव दृढ भाव । भेटणें त्वां एकाकी ।। २२ ।। बृहस्पति दिन सायंकाळी । ध्यान श्रीगुरुचरणकमळीं । आप्पा जाती गुरुदेऊळी । फुलसुंदरासी अनुचरत ।। २३ ।। परी कैसे विपरीत घडे । मंदिर द्वार नसे उघडे । आप्पा घाली निर्वाण साकडे । माउली न देई दाद ।। २४।। देवमंदिरी काशीबाई । बहिर्तिष्ठति मंदिरद्वारी । सत्त्वपरीक्षा कीं घे भारी। नामदेव गुरु सत्पुत्राची ।। २५।। माता नेणें पुत्रासी । पुत्र नेणतो मातेसी । अगम्य, अतर्क लीला ऐसी। खेळती नामदेवस्वामी ।। २६ ।। अंती गुरु आज्ञा होई । उघडी कवाड काशीबाई । आप्पा क्षणीं चरणीं जाई । गुरुमाउलीच्या ।। २७।। गुरु खेळती नूतन डावा । विष्ठा गुरुची क्षालुनी सेवा । आरंभिती आप्पारावा । थोर भक्त ते सत्य ।। २८।। तदनंतरी मंदवारी । आप्पा जाती गुरुमंदिरी । गुरु आज्ञा धरूनी शिरी । खंड न पडे नियमात ।। २९।। आप्पा जाती गुरुमंदिरी । संगे घेती भाजी भाकरी । सायंसमयी जा अंधारी । स्वगृही भक्त ।। ३०।। दिवसामागुनी दिवस सरले । अपरंपार कष्ट

साहिले । उत्तीर्ण परीक्षा भक्त जाहले । तुष्टति सद्गुरुस्वामी ।। ३१ ।। गुरु जाणती भक्त भावा । अतः वदती आप्पारावा । सदा मंदिरी बा तूं राहा । निजगृह जाणी समाधीस रे ।। ३२।। अत्यानंदे आप्पा वसती । स्मशानमंदिरी गुरु सांगाती । सद्गुरु करिती नवनिर्मिती । आप्पा जगदाळेची ।। ३३ ।। सद्गुरु माया भक्त न जाणे । अतः क्वचित् समयीं म्हणे । उचित वाटे निजगृही जाणे । गुरु आज्ञा ना परी ।। ३४ ।। कितीक संवत्सरे सरली । आप्पासेवा घेई माउली । प्रपंच पडे जधीं पाऊली। तंववरी मंदिरी वसती आप्पा ।। ३५ ।। येणेंपरी मातापुत्रा । भेट घडविती सद्गुरुदाता । प्रपंचही तोच घडविता । अतर्क्य लीला सद्गुरुची ।। ३६ ।। म्हणोनि श्रीसद्गुरुचरणीं। अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३७।। इति अध्याय पंधरावा समाप्त।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। माता पुत्र ।।

अध्याय सोळावा

श्रीगणेशाय नमः । ईश्वरे निर्मिले विश्व । मनुज तयाचा सर्वस्व । अतः रक्षितसे तयासी देव । अनन्यरूपें प्रीतीनें ।।१।। गुरुमूर्ति साक्षात् ईश । ब्रह्मा विष्णु श्रीमहेश । सद्गुरुरूप तयाची साक्ष । सद्भक्त जाणितसे ।। २।। रामकृष्णांचा परमभक्त । नामदेव महाराज जाणत । काशीबाईंसी द्यावा सुत । तथा संरक्षिणें समाधीसी ।। ३ ।। माय हृदयीं फुटो पान्हा । अंतरी उद्भवो पुत्रभावना । तथा वात्सल्य आणि करुणा । आप्पालागी काशीईची ।।४।। आप्पासही लाभे माता । करावी तेणें सेवा, ममता । प्रौढत्वी व्हावा तिजसी त्राता । आप्पाराव माउलीसी ।।५।। आतां सरली शुष्क रुक्षता । पुत्रभावना व्यापी चित्ता । मूर्त होई की वत्सलता । काशीबाईं रूपें ।। ६ ।। सेवाधर्मी रमली काशी । संरक्षी ती गुरुदेवांसी । तथा रुग्ण जगदाळेसी । सार्थ होई नाम आई ।।७।। सरल स्वभावी आप्पारावा । सहज बोले नच हो कावा । नकळत कष्टी तेणें व्हावा । मठवासी वा काशी ।।८।।

नामदेव पूर्ण जाणी । आप्पाजींची निर्मल वाणी । क्रुद्ध न व्हावे अतः कोणी । वदती गुरु तदा ।।९।। आप्पांचे हो शुभमंगल । तेणें जीवनी फुलला परिमल । आप्पा गृहीं पत्नी केवळ । संसार चालला पुढे ।।१०।। आप्पासी परी माउलीची । काशीईसी आप्पाजींची । अतीव ओढ अंतरीची । वृद्धिंगत होई ।।११।। क्वचित समयी परतुनी येती । तदा तम दिशादिगन्ती । मायनेत्री चिंता भीति । आप्पा सत्पुत्रास्तव ।।१२।। समान होई पुत्रावस्था । अस्तमानीं जाता सविता । माता ओढी पुत्र चित्ता । देह जरी निजकर्तव्यीं ।।१३।। विवाह पश्चात् निजगृही । आप्पा वसे पत्नीसही । मठासमीप मुंबापुरी। परी न रमे प्रपंची ।।१४।। नच शांति मना चित्ता । भार्या नेणें नगरवार्ता । नेणें तिजसी भवभयचिंता । आप्पा होती अतीव व्याकूळ ।।१५।। आप्पा मनीची असह्य तगमग । अजाण दुर्बल पत्नीसंग । तशांत अवचित येई प्रसंग । नुरे निवारा त्यांसी ।।१६।। नीलकंठ नामें पुत्र । होता तदा व्याधियुक्त । अपार यत्न करिती वैद्य । उणे न हो व्याधि ।।१७।। तदा माउली वदे तयांसी । मठमंदिरी निवासासी । भार्यापुत्र समवेसी । यावे बा गुरुबंधो ।।१८।। वत्सल काशीबाई करी । रुग्णसेवा परोपरी । आप्पालाही ती सावरी । परदुःखहारिणी ।।१९।। आप्पापत्नीलागी जननी । देई

लीलया भवसंजिवनी । पावन, मंगल, सुंदर गृहिणी । तत्पश्चात् ती होई ।।२०।। उषःकाली मठपरिसरा । झाडोनी करी पवित्र सुंदरा । दीपज्योती शुभंकरा । मंदिरी लावी तत्पश्चात् ।।२१।। प्रपंची तैसी घडे क्रांति । तेणें तुष्ट पति चित्तीं । सौख्य भरे अवतीभवती । संतृप्त काशी माउली ।।२२।। एके समयीं पौषमासी । माउली जाई नाशिकासी । प्रियभक्त जा सांगाती । तीर्थयात्रा कारणें ।। २३ ।। भेटोनी श्रीत्र्यंबकेश्वरी । परतता समस्त यात्रेकरी । परमानंद सकलान्तरी । माउली जा निद्रावस्थी ।।२४।। उषःकाली अकस्मात । अगम्य विपरीत स्वप्नांत । श्रीगुरुदेव तिजसी म्हणत। त्वरित जाई मुंबापुरी ।।२५।। भयभीत काशीबाई । तैसे समस्त भक्तजनही । न सुचे ना करिती घाई । परतण्या निज सदनासी ।। २६ ।। मुंबापुरी समाधिमंदिरीं । जाती सकल यात्रेकरी । भीतरी ना जाती परी । काशी कीं आप्पाराव ।। २७।। त्याच दिनीं यशवंत । आंबेडकर प्रिय पुत्र । अकस्मात होई मृत । स्मशानी नेती कलेवरा ।। २८ ।। ताटीसह सहस्र जन । देखती सकल भक्त गण। ये जा करिती द्वारातून । समाधिमंदिरा उल्लंघती ।। २९ ।। मंदिराची शुचि शुद्धता । नेणती स्वल्पही सकल जनता । समाधीवरी निःशंक बैसती । पादत्राणें पदीं, मुखी धूम्र ।। ३० ।। समाधीची

विटंबना । देखोनी काशीसी हो यातना । समस्तांसी करी याचना । करुणा भाकी परोपरी ।।३१।। जन हृदयीं परी वसती । भूतप्रेत दानव शक्ती । काशीसी ते धिःकारिती । उपहासे हंसती आनंदे ।। ३२ ।। तदा पादुकांसभोवर । धरोनी करांमध्यें कर । नरशृंखला करी सत्वर । काशीबाई तथा आप्पा ।। ३३ ।। तेणें जन होती रुष्ट । म्हणती दिसे आम्हा स्पष्ट । हीन लेखती दूर सारित । अतः क्रुद्ध आंबेडकरजन ।। ३४ ।। आंबेडकर अनुयायी । नेणती माउली काशीबाई । समभाव समस्तांपायी । असे काशीबाईंचा ।। ३५ ।। संरक्षिणें शुचिपावन । सद्‌गुरुचे मंगल स्थान । हाची भाव हेची ध्यान । होते श्रीमाउलीचे ।। ३६ ।। करुनी अर्थ विपरीत । आंबेडकर अनुयायी कोपित । परी कोणी अकस्मात । जाणियेला भक्त भाव ।। ३७।। जाणोनी भक्तांचा शुद्ध भाव । त्यजिती देवस्थान, देव । परतुनी जाती सकल मानव । भक्तांसी रक्षी सद्‌गुरुराणा ।। ३८ ।। म्हणोनी श्रीसद्‌गुरुचरणी । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हें प्रेमें अर्पुनी । अध्याय समाप्ती करी ।। ३९ ।। इति अध्याय सोळावा समाप्त ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।

।। दीपस्तंभ ।।

अध्याय सतरावा

श्रीगणेशाय नमः । आता उरलो कामापुरता । तुका म्हणे अंती जगता । विठ्ठलकार्य हो सरता । स्वारस्य नुरे जीवनी ।।१।। ईश्वरदूत साधुसंत । जनसेवा त्यांचे व्रत । भक्तोद्धरण्या जगतात । अवतरती अनन्यरूपें ।।२।। करिता दूरी अज्ञानांधार । अजाण पंगु दुर्बलाधार । दाविती विविध चमत्कार । अनेकानि रूपें जगता ।। ३ ।। माउली जाणे सरले कार्य । मंदिरी तिष्ठति गुरुराय । समाधीसही ना अपाय । उरला आतां वाटे तिसी ।।४।। एकदां वदे काशीबाई । वैशाखमासी वैकुंठासी । श्रीसद्‌गुरुचरणांपाशी । जाईन वाटे मजलागी ।। ५ ।। श्रवणीं पडतां माउलीवाणी । भयभीत हो अंतःकरणी । आप्पाराव भक्त तत्क्षणी । व्याकूळले अतीव चित्तीं ।। ६ ।। माउली हो प्रेरक शक्ती । संजीवनी ती भक्ताप्रती । आप्पा तथा अन्य जाणती । अतः कष्टी होती सकल ।।७।। प्रार्थीं आप्पा माउलीसी । समाधी मंदिर वैभवासी । तथा भक्त भाविकांसी । पूर्णत्वाप्रती न्यावे तुवा ।।८।। करण्या मंदिर जीर्णोद्धारा । तथा भक्तांसी देण्या आधारा । न त्यागी तूं जड शरीरा । जीर्ण जरी होई ते ।। ९।। जरी दुर्बल होई कुडी । माये गे ती ना तूं सोडी। तुजवीण

न प्रपंची आवडी । तुजवीण मी असहाय ।।१०।। वात्सल्यमूर्त तदा माउली । पुत्रस्नेहे कळवळली । तियेची दृष्टि पाणावली । अतः जगली दीर्घायुष्य ।।११।। जधी आप्पा ज्ञानी जाहले । श्रद्धा बुद्धि वृद्धिंगले । तदा वैकुंठी प्रयाण केले । काशीमाई माउलीनें ।।१२।। आप्पा जगदाळे पुत्र । मठनिवासी बहुत भक्त । तैसे अन्य भक्त गृहस्थ । शोकाकुल बहु झाले ।।१३।। तरी मंदिर संरक्षिणें । पूजा अर्चा नेमें करणें । भावभक्तीचा मळा फुलविणें । आप्पाराव बनले माळी ।।१४।। दहनभूमी पास मंदिर । रामकृष्ण त्या शिल्पकार । नामदेवें सभोंवार । फुलविला भक्तीबाग ।।१५।। काशीबाई थोर माउली । तृण, कंटक कष्टें उपटुनी । चढविला वरी साज मोहनी । लावण्य जैसे हो साकार ।। १६ ।। काशीपुत्र आप्पाराव । मंदिरासी दे नव रूप । दिन दिन सेवाभाव । तयांचा हो वृद्धिंगत ।।१७।। दहनभूमी मानवास । करीतसे भयभीत । जया जन्म तया अंत । जरी जाणी मनुज नित्य ।। १८ ।। मृत्युपाशी जीवन उमले । ऐसे कधीं कुणी जाणिले । समाधिमंदिरें मनुजा दिधले । आगळे स्वप्न नवे एक ।।१९।। आप्पाराव ओंजळीत । नियती टाकी बिल्वपत्र । प्राणपणें तें जपत । आप्पा जगदाळे उरले ।।२०।। सत्त्व रज तम गुण । एकरुप होती सगुण । एकजीविता होता त्रिगुण । निर्विकार होई भक्त ।। २१ ।। आप्पा जगदाळे नर ।

बिल्वपत्राधारे पार । करी सहज भवसागर । धन्य तयाचे जीवन ।। २२ ।। दिनरात सेवाधर्मी । आप्पा जगती लुप्त 'अहं', 'मी'। चंदनापरी मठकामी । अविरत झिजवी कुडी ।। २३ ।। गृहस्थ भक्तांप्रती । आप्पा दीपस्तंभ होती । अचूक सुलभ मार्ग दाविती । अतः गृहस्थ जाती लोटांगणी ।। २४।। काम क्रोध माया मोह । विरहीत त्यांचा वृद्ध देह । संभाळी श्रीईश्वर देव । जनकल्याणास्तव ।। २५।। हरेक भक्त प्रार्थी ईश्वरा । दीर्घायु दे ऐशा नरा । तोची तारक ह्या संसारा । तोची गुरु तोची रक्षक ।। २६ ।। ऐसे हें अपूर्व चरित्र । नर देहीं खेळे भगवंत । जाणोनी समस्त भक्त । दिनरात ध्याती ।। २७।। श्रीरामकृष्ण देवासी । भजावे अहर्निशी । 'अहं' भाव चरणापाशी । त्यजावा नम्रभावे ।। २८ ।। पढावे चरित्र अलौकिक । अखंड नित्य हो भाविक । उमलतील भाव सात्त्विक । दिव्यत्वाची होईल साक्ष ।। २९ ।। चरित्र नौका पाल्हाळिता । पार कराल भवसरिता । शिला पत्थर दूर सारिता । पैलतीर होई सुलभ ।। ३०।। म्हणोनी श्रीपुस्तकरूपे । सद्गुरु प्राप्ती आपैपे । जाणोनी भाविक हे सोपे । साधन संग्रही ठेवावे ।। ३१ ।। ठेवोनी माथा गुरु चरणी । वाहे चरित्र तयां चरणी । अद्भुत ही तयांची करणी। जाणा भाविक हो ।। ३२।। गुरु गजानन बुद्धी दाता । गुरुशारदा तोची कर्ता । पुस्तकरूपे तोची करविता । लेखनिक

निमित्तमात्र ।। ३३।। माझीया हृदयी प्रगटून । करांगुलिते स्पर्शून । चरित्ररूपे दे दर्शन । सद्‌गुरु स्वामी भक्तांसी ।। ३४।। करा आरती श्रीगुरुची । करा अर्चना सत्‌शिष्यांची । कृपारूपे प्रसादाची । साऊली मिळे संसारी ।। ३५ ।। अतः असावे चरित्र संग्रही । वाचावे प्रेमे प्रत्यही । शांती सौख्य लाभे गृही । कृतार्थ हो जीवन ।। ३६ ।। म्हणोनी श्रीसद्‌गुरुचरणी । अनन्यभावें शिर ठेवूनी । बिल्वपत्र हे प्रेमें अर्पुनी। अध्याय समाप्ती करी ।। ३७।। इति अध्याय सतरावा समाप्त ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

।। श्रीरामकृष्णमहाराज चरणीं अर्पण ।।
।। शुभंभवतु ।।

अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज । श्रीसद्‌गुरु स्वामीसमर्थ रामकृष्ण महाराज की जय। श्रीसद्‌गुरु स्वामीसमर्थ नामदेव महाराज की जय । श्रीसद्‌गुरु काशीबाई माउली की जय। श्रीसद्‌गुरु स्वामीसमर्थ आप्पा महाराज की जय । जगदंब उदयोऽस्तु ।।

श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर समाधी मंदिर येथे संपन्न होणारे उपक्रम / उत्सव / कार्यक्रम...

१) रविवार दुपारी ३.०० ते ६.३० वा. कीर्तन वर्ग
२) रविवार सायं. ७ ते ८.३० वा. राम नाम काशी भजन सेवा
३) बिल्वपत्र भक्तिसार पोथीचे सामुदायिक पारायण महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी
४) श्रीस्वामी समर्थ चरित्र सारामृत - २१ अध्याय पोथीचे सामुदायिक पारायण : महिन्याच्या चौथ्या गुरुवारी
५) भागवत एकादशी : सायं. ७ ते ८.३० वा. कीर्तन
६) चैत्री नवरात्रोत्सव : गुढीपाडवा ते रामनवमी, चैत्र शुद्ध प्रतिपदा ते चैत्र शुद्ध नवमी
७) श्रीराम नवमी : चैत्र शुद्ध नवमी
८) श्रीहनुमान जयंती: चैत्र पौर्णिमा
९) विजय दिन : २२ एप्रिल
१०) वटपौर्णिमा : ज्येष्ठ पौर्णिमा दिनी, सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वा. वटपूजन
११) श्रीगुरुपौर्णिमा : आषाढ पौर्णिमा
१२) श्रावण महिन्यानिमित्त कीर्तनं : संपूर्ण श्रावण महिनाभर कीर्तनं : सायं. ७ ते ८.३० वा.
१३) श्रीकृष्ण जयंती (जन्माष्टमी) : रात्रौ ९.०० ते १२.३० वा.
१४) श्रीआप्पा महाराज जगदाळे पुण्यतिथी : भाद्रपद शुद्ध प्रतिपदा
१५) आश्विन नवरात्रोत्सव : आश्विन शु. प्रतिपदा ते आश्विन शुद्ध नवमी
१६) माउली काशीबाई चव्हाण पुण्यतिथी : आश्विन शुद्ध द्वितीया
१७) श्रीनामदेव महाराज केळकर पुण्यतिथी : मार्गशीर्ष शु. पंचमी
१८) मार्गशीर्ष मास महोत्सव : दि. ०७ डिसेंबर ते २१ डिसेंबर श्रीगुरुलीलामृत पोथीचे सामुदायिक पारायण
१९) श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर पुण्यतिथी : पौष शु. प्रतिपदा
२०) तीळगुळ समारंभ : जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या रविवारी
२१) श्रीगुरुप्रतिपदा : माघ वद्य प्रतिपदा
२२) महाशिवरात्री : माघ वद्य त्रयोदशी

श्रीजांभेकर महाराज सेवा समितीची प्रकाशने

१) **श्रीनामदेव महाराज केळकर** (चरित्र, भक्तांच्या आठवणी व अनुभव) लेखक – श्री. पु. बा. कुलकर्णी

२) **श्रीरामकृष्ण महाराज जांभेकर** (चरित्र, भक्तांच्या आठवणी व अनुभव) लेखक – श्री. पु. बा. कुलकर्णी
नवी आवृत्ती/नवे संशोधन उत्तरपंथ – प्रे. वि. मयेकर मुळगांवकर

३) **श्रीमाउली काशीबाई चव्हाण** (चरित्र, भक्तांच्या आठवणी व अनुभव) लेखक – श्री. पु. बा. कुलकर्णी

४) **श्रीआप्पा महाराज जगदाळे चरित्र,** लेखक – प्रा. गिरीश जोशी

५) **आरती संग्रह**

६) **बिल्वपत्र** (तीन साक्षात्कारी संतांची चरित्रे, आठवणी, चमत्कार व शिकवण)
लेखक – प्रा. रवींद्र धामापूरकर (एम्.ए.बी.एड्.) नवी आवृत्ती/नवे संशोधन उत्तरपंथ – प्रे. वि. मुळगांवकर

७) **संजीवन लहरी** (त्रैमासिक) संस्थापक– आद्य संपादक – पूज्य आप्पा जगदाळे (सन १९८९ पासून)

८) **राम–नाम–काशी – काव्यसंग्रह** : संतकवी श्री. शंकर दिनकर राणे

९) **ध्वनीफीत (सीडी)** – जप (ॐ श्रीरामकृष्णनाथा दयासागरा कृपा करा । दयासागरा कृपा करा ।।)

१०) **बिल्वपत्र – भक्तिसार पोथी** – रचयिता – शारदा पागनीस

११) **जपा मंत्र सोपा (जप माहात्म्य)** लेखक – प्रा. रवींद्र धामापूरकर (एम्.ए.बी.एड्.)

१२) **आठ चाळीसा स्तोत्रे** – रचयिता – प्रा. रवींद्र धामापूरकर (एम्.ए.बी.एड्.)